# लोकसभेची सेमिफायनल भाजपने जिंकली

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**लोकसभेची सेमिफायनल म्हणून मानल्या जाणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये पाचपैकी चार राज्यांचे निकाल रविवारी (दि.३) जाहीर झाले असून भारतीय जनता पक्षाने तीन राज्यांत एकहाती सत्ता मिळविली आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये 'कमळ' फुलले, तर तेलंगणामध्ये बीआरएसची पिछेहाट होऊन काँग्रेसने बस्तान बसवले. चारपैकी तीन राज्यांत भाजपने मिळविलेल्या विजयामुळे देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लाट कायम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीला मात्र जबर धक्का बसला आहे.**



रायगड, नवी मुंबई

**राम प्रहर**

◆ वर्ष १६ ◆ अंक १३७

www.ramprahar.com

सोमवार, ४ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# चारपैकी तीन राज्यांत सत्ता; इंडिया आघाडीचा पराभव



हाती आलेल्या कलांनुसार मध्य प्रदेशमध्ये एकूण २३० जागांपैकी भाजपने बहुमताचा आकडा गाठला असून १६०हून अधिक जागा जिंकल्या आहेत. दुसरीकडे काँग्रेसला येथे शंभरीही गाठता आली नाही. १९९ जागा असलेल्या राजस्थानमध्ये सत्तापालट झाले आहे. तेथे भाजपने ११०पेक्षा जास्त जागी विजय संपादन केला, तर काँग्रेसला दोन आकडी जागांवर समाधान मानावे लागले. छत्तीसगडमध्येही भाजपच सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. तेथे भाजपने एकूण ९०पैकी ५०हून अधिक जागा जिंकत बहुमत मिळविले, तर काँग्रेसने सुमारे ३५ जागा जिंकल्या. एकूण ११९ जागा असलेल्या तेलंगणामध्ये बीआरएसची सत्ता गेली आहे. काँग्रेसला ६०च्या वर, बीआरएसला सुमारे ३९, भाजप आणि एमआयएमला आठ जागा मिळाल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, या विजयासह भाजपकडे देशभरातील १२ राज्यांचे नेतृत्व असेल, तर काँग्रेसकडे फक्त तीन राज्ये उरतील. केंद्रातील सत्ताधारी भाजप सध्या उत्तराखंड, हरियाणा, उत्तर प्रदेश, गुजरात, गोवा, आसाम, त्रिपुरा, मणिपूर, अरुणाचल प्रदेश आणि मध्य प्रदेशात सत्तेवर आहे. या विजयानंतर राजस्थान आणि छत्तीसगडमध्येही भाजपचे कमळ फुलले आहे.

पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार या १२ राज्यांव्यतिरिक्त महाराष्ट्र, मेघालय, नागालँड आणि सिक्कीममध्येही भाजप इतर पक्षांसोबत सत्तेत आहे.

दुसरीकडे काँग्रेसची सत्ता फक्त हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकात आहे. काँग्रेसने तेलंगणाच्या रूपात दक्षिणेत आणखी एक राज्य काबीज केले आहे. याशिवाय बिहार आणि झारखंडमधील सत्ताधारी आघाडीत काँग्रेसचा समावेश आहे. ताज्या निकालामुळे इंडिया आघाडीला धक्का बसला आहे.

## पंतप्रधान मोदींनी मानले जनतेचे आभार

**नवी दिल्ली** : विजयाचे शिल्पकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधानसभा निवडणूक निकालावर आपली प्रतिक्रिया देत जनतेचे आभार मानले आहेत. 'जनतेला माझा प्रणाम!



मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या निवडणूक निकालांवरून भारतातील जनतेचा विश्वास केवळ सुशासन आणि विकासाच्या राजकारणावर आहे, त्यांचा विश्वास भाजपवर आहे हे सिद्ध होते. भाजपला प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद दिल्याबद्दल मी या सर्व राज्यातील मतदारांचे, विशेषत: माता, बहिणी, मुली आणि आमच्या तरुण मतदारांचे मनापासून आभार मानतो. मी त्यांना खात्री देतो की, आम्ही तुमच्या कल्याणासाठी अथक प्रयत्न करत राहू, असे पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करीत म्हटले आहे. दरम्यान, दिल्ली मुख्यालयात पंतप्रधानांचे पक्षाकडून मोठा हार घालून जोरदार स्वागत करण्यात आले. **(पान २ वर..)**

**जनतेच्या मनात केवळ आणि केवळ मोदी आहेत. आजच्या निवडणूक निकालांनी हे सिद्ध केले आहे की, तुष्टीकरण आणि जातीवर राजकारणाचे दिवस आता संपले आहेत. आता नवा भारत हा पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्सवर मतदान करतो. या प्रचंड पाठिंब्याबद्दल मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमधील जनतेला नमन करतो. भाजपच्या या भव्य विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खूप खूप अभिनंदन!**
**–अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री**

# पनवती कोण आहे हे काँग्रेसला कळले असेल

## उपमुख्यमंत्री फडणवीसांचा टोला



**मुंबई** : चार राज्यांतील विजयाचे श्रेय खऱ्या अर्थाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहे तसेच आमचे अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह जी भाजपची टीम आहे त्या सगळ्यांचे श्रेय आहे. या सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आता पनवती कोण आहे हे काँग्रेसला कळले असेल. निवडणूक निकालात ते दिसून आले आहे. त्यामुळे राहुल गांधी किंवा काँग्रेसचे लोक यापुढे पंतप्रधान नरेंद्र मोदींबाबत असे शब्द वापरणार नाहीत याची मला खात्री आहे, असेही ते म्हणाले

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चार राज्यांच्या निकालांवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, चारपैकी तीन राज्यांमध्ये भाजपला अभूतपूर्व यश मिळाले आहे. जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जो विश्वास दाखवला त्याचेच हे यश आहे. पंतप्रधान मोदींनी ज्या प्रकारे गरीब कल्याणाचा अजेंडा राबवला. सामान्य माणसाच्या मनात हे बिंबवले की सरकार त्यांच्यासाठी काम करते आहे. त्याचे प्रत्यंतर लोकांना पाहण्यास मिळाले. हा त्याचा विजय आहे.

आम्हाला यश मिळाले की, ते ईडी, सीबीआयने दिलेले यश आहे म्हणायचे आणि त्यांना यश मिळाले की, जनतेचा कौल म्हणायचे. या मानसिकतेत जोपर्यंत विरोधक असतील तोपर्यंत ते सत्तेत येणार नाहीत, असा टोला उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

निकालाचे विश्लेषण करताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, भाजपची मते वाढली आहेत. हा निकाल जनतेच्या मनात काय आहे याची नांदी आहे. लोकसभेत जो अभूतपूर्व विजय भाजपला आणि एनडीएला मिळणार त्याची ही सुरुवात आहे. इंडिया आघाडीला लोकांनी नाकारले आहे. राहुल गांधींचा अजेंडाही लोकांनी नाकारला आहे.

महाराष्ट्रात ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये दोन तृतीयांश ग्रामपंचायती महायुतीने जिंकल्या. लोकसभेत हेच होणार आहे. महाराष्ट्रात आणि देशात भाजपच सत्तेत आलेला पाहण्यास मिळणार आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

# भाजपच्या विजयाबद्दल पनवेलसह रायगड जिल्ह्यात आनंदोत्सव





(छाया : सुबोध ठाकूर)

**पनवेल** : पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत रविवारी (दि.३) निकाल जाहीर झालेल्या चारपैकी तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. या विजयानंतर पनवेलमधील भाजपच्या पनवेल तालुका व शहर कार्यालय येथे पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आनंद व्यक्त करण्यात आला. या वेळी फटाक्यांची आतजबाजी करून, वाद्यांच्या गजरात नाचून व पेढे वाटून कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. जिल्ह्यात इतर ठिकाणीही आनंदोत्सव साजरा झाला.

भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये विजय मिळवून काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला धोबीपछाड दिला आहे. या विजयानंतर पनवेल येथे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करून एकमेकांचे अभिनंदन केले.

या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, महिला मोर्चा शहराध्यक्ष व माजी नगरसेविका राजश्री वावेकर, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, युवा वॉरियर्स जिल्हा संयोजक देवांशू प्रभाळे, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, के. सी. पाटील, रूपेश नागवेकर, महेश सरदेसाई आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्ह्यातील अन्य भागांतही भाजपकडून या विजयाबद्दल वाजतगाजत जल्लोष करण्यात आला.

## पंतप्रधान मोदींच्या विकासाच्या मंत्रावर जनतेचा विश्वास –आमदार प्रशांत ठाकूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ, सबका विकास या विकासाच्या मंत्रावर जनतेचा विश्वास आहे हे मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगडच्या विधानसभा निवडणूक निकालावरून स्पष्ट झाले आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केली. ते म्हणाले, मोदीजींच्या नेतृत्वाखाली देश प्रगती करू शकतो हे विशेषत्वाने तीन राज्यांतील जनतेने दाखवून दिले आहे. देशात २०१४पासून विकासाची यात्रा सुरू आहे. आपला देश वेगवेगळ्या क्षेत्रांत प्रगती करतोय. मोदीजींची मेहनत व दूरदृष्टीतून हे होतंय. या निकालावरून विकासपुरुष कोण आणि पनवती कोण हेही स्पष्ट झाले आहे. २०२४मध्ये अबकी बार साडेतीनशे पार करूया. या वेळी त्यांनी देशाचे विकासपुरुष पंतप्रधान मोदी, भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा व केंद्रीय मंत्री अमित शाह यांचे अभिनंदन करून व आभार मानून त्यांचे नेतृत्व असेच देशाला मिळत राहो, असे नमूद केले.

# युवा वॉरियर्सच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा युवा वॉरिअर्सची बैठक भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत शनिवारी (दि.२) पनवेल येथे झाली. या वेळी युवा वॉरियर्सच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, जिल्हा चिटणीस चिन्मय समेळ, सरचिटणीस दिनेश खानावकर, खारघर अध्यक्ष नितेश पाटील, कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक, कर्जत अध्यक्ष प्रज्ञेश खेडकर, खालापूर अध्यक्ष नागेश पाटील, अभिषेक भोपी, अक्षय सिंग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**




# रोह्यात पतीकडून पत्नीचा खून

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पाले खुर्द येथे पतीने पत्नीवर सपासप वार करीत तिचा खून केल्याची घटना रविवारी (दि.३) पहाटे घडली. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

पाले खुर्द येथील वैभव राम ठाकूर (३७) याने घर बांधकाम कर्ज वादातून पत्नी विद्या (३३) हिच्यावर कोयत्याने सपासप वार करत तिला जिवे मारले. घटनेची माहिती मिळताच कोलाड पोलीस निरीक्षक अजित साबळे यांनी घटनास्थळी भेट देत आरोपीस ताब्यात घेतले. या प्रकरणी आरोपीविरोधात भा.दं.वि. कलम ३०२,५०४, ५०६ प्रमाणे गुन्ह्याची नोंद झाली असून अधिक तपास सुरू आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगायचे असतात –पद्मश्री दादा इदाते/३**

# देशाला पंतप्रधान मोदींशिवाय पर्याय नाही ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे श्रीवर्धनमध्ये प्रतिपादन

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

तीन राज्यांमध्ये भाजपने काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला पराभूत केले आहे. आपल्या भारत देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय पर्याय नाही, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रीवर्धन येथे रविवारी (दि.३) केले. श्रीवर्धन शहरासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प व पाणीपुरवठा योजना तसेच समुद्रकिनारा सुशोभीकरण या कामांचे उद्घाटन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.



कोकणातील शेतकरी आंबा, काजू, नारळ, सुपारी यांच्या बागा व फळांची पिके घेऊन आपला उदरनिर्वाह करीत असतो. ज्याप्रमाणे विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या ठिकाणच्या शेतकऱ्यांना सोयाबीन, कांदा, टोमॅटोसाठी शासनाकडून मदत दिली जाते, त्याप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांनादेखील यापुढे मदत करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री पवार यांनी या वेळी केली.

कोकण किनारपट्टीला वादळाचा फटका बसल्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते. म्हणून वादळात टिकतील अशी निवारा केंद्र शासनाकडून बांधली जाणार आहेत. वादळात विजेचे खांब पडल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अनेक दिवसांचा कालावधी लागतो. ते लक्षात घेता संपूर्ण कोकणामध्ये अंडरग्राउंड इलेक्ट्रिसिटी लाईन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. **(पान २ वर..)**

# स्वच्छ, सुंदर मुंबईसाठी मुख्यमंत्री उतरले रस्त्यावर

## सफाई कामगार मुंबईचे खरे हिरो -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त करण्याच्या ध्यास घेतलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ३) सकाळी ६.३०वा. सुरू केलेला स्वच्छतेचा जागर दुपारपर्यंत सुरू होता. मुंबईतील विविध ठिकाणांना भेटी देत त्यांनी डीप क्लिन मोहिमेचा शुभारंभ केला. सायन, धारावी, कमला नेहरू पार्क, बाणगंगा, बीआयटी चाळ परिसर या भागांना भेटी देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली स्वच्छतेची मॅरेथॉन जवळपास सहा तास सुरू होती.



या भेटीत मुख्यमंत्र्यांनी अंतर्गत रस्ते, गटार, नालेसफाई, रस्त्यांची सफाई कामांची पाहणी केली. जागोजागी सफाई कामगारांशी त्यांनी संवाद साधला. सफाई कामगार मुंबईचे खरे हिरो आहेत, असे गौरवोद्गारही मुख्यमंत्र्यांनी काढले.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या संकल्पनेतून मुंबईत डीप क्लिन मोहिमेचा रविवारी शुभारंभ झाला. धारावी टी जंक्शन येथून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. शालेय विद्यार्थी, सफाई कामगार यांच्याशी संवाद साधत मुंबईची स्वच्छता मोहीम ही लोकचळवळ झाली पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी या वेळी केले. नालेसफाई, रस्ते धुणे या कामांच्या पाहणीसाठी मुख्यमंत्र्यांनी बऱ्याच ठिकाणी पायपीट केली.

मुंबईत असलेल्या २४ वॉर्डमध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. एकाच वेळी एका वॉर्डमध्ये अन्य चार ते पाच वॉर्डातील सफाई कर्मचारी बोलावून सुमारे तीन ते चार हजार सफाई कामगारांच्या माध्यमातून रस्ते, गटारी, पदपथ, नालेसफाई या मोहिमेंतर्गत करण्यात येत आहे. या मोहिमेमुळे सफाई कामगारांचे जत्थे आज मुंबईच्या एफ उत्तर, जी उत्तर, डी वार्डमध्ये दिसत होते. प्रत्येकाच्या हातात झाडू आणि जोडीला रस्ते धुणारी यंत्रे, फॉगर, स्मोक गन या अत्याधुनिक साहित्याच्या मदतीने स्वच्छतेचा जागर सुरू होता.

प्रदूषणमुक्तीवर उपाययोजना म्हणून मुंबईचे रस्ते धुताना आधी त्यावरील माती उचलून मग उच्च दाबाने पाणी मारून रस्ते धुवावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. या सखोल स्वच्छता मोहिमेचा परिणाम येत्या काही दिवसात नक्कीच बघायला मिळेल. सफाई कर्मचारी सकाळी लवकर कामाला सुरुवात करतात. मुंबईकरांच्या निरोगी आयुष्याची जबाबदारी त्यांच्यावर असून मुंबईचे खरे हिरो ते आहेत, असे सांगत त्यांनी ठरवले तर मुंबई, स्वच्छ, निरोगी आणि प्रदूषणमुक्त व्हायला वेळ लागणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या स्वच्छताविषयक उपक्रमाला सर्व घटकांचा प्रतिसाद लाभला.

### सफाई कामगारांच्या ४८ वसाहतींचा कायापालट

मुंबईतील सफाई कामगारांच्या ४८ वसाहतींचा कायापालट करण्यात येणार असून गौतम नगर, कासरवाडी येथील वसाहतींना भेटी दिल्या आहेत. या सर्व वसाहतींमध्ये दर्जेदार सोयीसुविधा देण्यात येतील. स्वच्छतेच्या बाबतीत मुंबईचे नाव देशात नव्हे तर जगात अग्रक्रमावर येऊद्या, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी सफाई कर्मचाऱ्यांना केले.

# कर्जत, खोपोलीमध्ये विद्युत रोहित्रातील तांबे चोरणारा जेरबंद



**कर्जत : प्रतिनिधी**

ऑगस्ट महिन्यापासून कर्जत, नेरळ, खोपोली परिसरात अचानक विद्युत रोहित्रामधील तांब्याच्या क्वॉईल चोरण्याचा घटनांत वाढ झाली होती. या प्रकरणात चोरट्यांना जेरबंद करण्यात नेरळ पोलीस पथकाला यश आले असून सात लाखांचा मुद्देमालदेखील जप्त करण्यात आला आहे.

नेरळ, कर्जत, खोपोली पोलीस ठाणे हद्दीत ऑगस्ट २०२३पासून विद्युत रोहित्रामधील तांब्याच्या क्वॉईल चोरीचे सत्र सुरू झाले होते. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे तीन, कर्जत पोलीस ठाणे येथे चार तर खोपोली पोलीस ठाणे येथे एक गुन्हा दाखल आहे.

नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, लिंगप्पा सरगर, नितीन मंडलीक, सहाय्यक फौजदार श्रीरंग किसवे, हवालदार नवनाथ म्हात्रे, शिपाई निलेश कुमरे, विनोद वांगणेकर यांचे पथक तयार करून तपासाला सुरुवात केली.

श्रीरंग किसवे यांना गोपनिय बातमीदारांमार्फत नेरळ परिसरात एक संशयित आढळून आला. त्यानुसार आवेश आस्लम खान, (वय २०, रा. जिते, मूळ रा. पिंपरा पोस्ट, मोहनकोला, ता. सोहरातगढ, जिल्हा सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश) यास चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याने गुन्ह्याची कबुली देऊन त्याचे आणखी दोन साथीदार शहजाद आब्बास खान व आशपाक आब्बास खान (रा. राजेंद्रगुरुनगर, नेरळ, कर्जत, मूळ रा. सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश) यांनी मिळून हे गुन्हे केल्याची कबुली दिली.

यातील आवेश आस्लम खान यास ३० नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली असून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कर्जत यांचे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

आरोपीकडून तीन लाख तीन हजार रूपये किमतीची ५०५ किलो ग्रॅमची तांब्याची तार, अंदाजे चार लाख रूपये किमतीची स्वीफ्ट गाडी, गुन्ह्यात वापरलेली हत्यारे जप्त करण्यात आले आहे. दोन आरोपी अद्याप फरार असून तपास सुरू आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त १२ विशेष लोकल

**मुंबई : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील दादर चैत्यभूमीवर अनुयायांची मोठी गर्दी होते. ही गर्दी लक्षात घेता, मध्य रेल्वेने विशेष १२ गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. यासंदर्भात मध्य रेल्वेने एक प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.

मध्ये रेल्वेने ५ आणि ६ डिसेंबर मध्यरात्री परळ-कल्याण आणि कुर्ला-पनवेलदरम्यान १२ विशेष लोकल गाड्या चालवण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. या उपनगरीय विशेष गाड्या सर्व स्थानकांवर थांबतील.

# भाजपच्या महाविजयाचा नवी मुंबईत महाजल्लोष

**नवी मुंबई : बातमीदार**

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमधील विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या महाविजयाचा महाजल्लोष रविवारी (दि. ३) नवी मुंबई भाजपच्या वतीने वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात साजरा करण्यात आला.



नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा जल्लोष साजरा झाला. माजी खासदार संजीव नाईक, आयटी सेलचे प्रमुख सतीश निकम, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती संपत शेवाळे, माजी स्थायी समिती सभापती नवीन गवते, महिला मोर्चाच्या अध्यक्ष माधुरी सुतार, अध्यक्ष अमित मेढकर, राजेश राय, अरुण पडते, माजी नगरसेवक उपस्थित होते. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या विजयाच्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला. मिठाई एकमेकांना वाटून विजयाचा आनंद गोड करण्यात आला. वाद्यांच्या तालावर ठेका धरत या वेळी कार्यकर्त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी, देशातील जनतेचा पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली या देशाचा यापुढेही विकास व्हावा हाच कौल जनतेने या निवडणूक निकालामध्ये दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने विरोधकांना चारी मुंड्या चित केल्याचे म्हणाले. केंद्रातील भाजप सरकारने देशातील सर्वच राज्यांच्या विकासाला पाठबळ दिले आहे. सर्व घटकांसाठी कल्याणाच्या योजना राबविल्या आहेत. आगामी लोकसभेमध्येदेखील भाजपचा विक्रमी विजय होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# खोपोलीत भाजप कार्यकर्त्यांचा आनंदोत्सव

**खोपोली : प्रतिनिधी**

उत्तर भारतात तीन राज्यात भारतीय जनता पक्षाने विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त केल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षातर्फे फटाके वाजवून व मिठाईचे वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

बाजारपेठेतील दीपक चौकात शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्या नेतृत्वाखाली शहर सरचिटणीस राहुल जाधव, शहर महिला अध्यक्ष शोभा काटे, जिल्हा महिला आघाडी सरचिटणीस अश्विनी अत्रे, शहर चिटणीस अजय इंगुलकर, शहर युवा अध्यक्ष डॉ. नचिकेत पाटील, ज्येष्ठ कार्यकर्त्या गीता मोहिते, शहर उपाध्यक्ष दिलीप पवार, व्यापारी सेलचे कीर्ती ओसवाल, मेडिकल सेलचे विकास खुरपडे, कर्जत खालापूर विस्तारक हेमंत नांदे, संजय कचरे, सागर काटे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.




# चैत्यभूमीवर सोयीसुविधा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी राज्य शासन आणि मुंबई महापालिकेमार्फत करण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येपासून ते ६ डिसेंबरपर्यंत आलेल्या अनुयायांच्या भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. ज्या ठिकाणी भोजनाची सोय करण्यात आली आहे त्याची पाहणीदेखील त्यांनी केली. आरोग्य व्यवस्था, स्वच्छता यासाठी त्यांनी महापालिका प्रशासनाला सूचना केल्या.

पान १ वरुन

## पंतप्रधान मोदींनी मानले जनतेचे आभार

'या निमित्ताने मी पक्षाच्या सर्व कष्टकरी कार्यकर्त्यांचे विशेष आभार मानतो. तुम्ही सर्वांनी एक सुंदर उदाहरण मांडले आहे. तुम्ही भाजपची विकास आणि गरीब कल्याणकारी धोरणे ज्या पद्धतीने लोकांमध्ये नेली ते अतिशय कौतुकस्पद आहे. विकसित भारताचे ध्येय घेऊन आपण पुढे जात आहोत. आपल्याला थांबायचे नाही, खचून जायचे नाही, तर भारताला विजयी करायचे आहे. आज आपण एकत्रितपणे या दिशेने ठोस पाऊल उचलले आहे, असेही पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले आहे.

आणखी एका पोस्टमध्ये पंतप्रधानांनी तेलंगणातील जनतेचेही आभार मानले. 'तेलंगणातील माझ्या प्रिय बंधू-भगिनींनो, तुम्ही दिलेल्या समर्थनासाठी खूप आभार. गेल्या काही वर्षांमध्ये तुमचा आम्हाला पाठिंबा वाढतच चालला आहे आणि पुढील काळातही हा ट्रेंड कायम राहील. तेलंगणासोबतचे आमचे नाते अतूट आहे आणि आम्ही लोकांसाठी काम करीत राहू. मी भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मेहनतीचेही कौतुक करतो,' असे त्यांनी म्हटले आहे.

## युवा वॉरियर्सच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

या वेळी देवांशु प्रबाळे यांची युवा वॉरियर्सच्या जिल्हा संयोजकपदी तसेच यश भोईर व आयुष किंद्रे यांची जिल्हा सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपचे विचार घरोघरी पोहचवून पक्षवाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे सूचित केले. त्याचप्रमाणे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही लोकांमध्ये जाऊन पक्ष वाढवा, असे आवाहन केले. युवा वॉरिअर्स जिल्हा संयोजक देवांशु प्रभाळे यांनी लवकरच जिल्ह्याच्या प्रत्येक बुथवर युवा वॉरिअर्सची बांधणी करण्याची ग्वाही दिली.

## देशाला पंतप्रधान मोदींशिवाय पर्याय नाही ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ

आपण जेवणाच्या पंगतीत बसल्यानंतर वाढपी ओळखीचा असावा लागतो. २८८ आमदारांच्या पंक्तीत आमची मुलगी आदितीदेखील आहे. तिच्या ताटात दोन पळ्या जास्तच वाढणार. तात्पर्य आदितीला निधी कमी पडू देणार नाही, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

रेवस-रेड्डी या सागरी महामार्गाला नऊ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. धरमतर खाडीवरील पूल व बागमांडले बाणकोट पूल यासाठी शासनाने जवळजवळ तीन हजार कोटींची तरतूद केलेली असून येत्या पंधरा दिवसांत याच्या निविदा काढलेल्या पहायला मिळतील. अनिकेत आपल्या भाषणात म्हणाला की, या ठिकाणी १३ ते १४ लाख पर्यटक दरवर्षी पर्यटनासाठी येतात आणि यातील बहुतांश पर्यटक पुणे किंवा पिंपरी चिंचवड या भागातील असतात. आता येणाऱ्या पर्यटकांनादेखील शुद्ध पाणी उपलब्ध होणार आहे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. राज्याच्या अल्पसंख्याक विभागासाठीही तातडीने बैठक घेऊन आम्ही काही निर्णय घेतले आहेत, कारण त्यांच्याही काही समस्या असतात. त्यादेखील सोडविल्या पाहिजेत, असे त्यांनी नमूद केले.

आम्ही वर्षभर सत्तेत नसताना सर्व कामे ठप्प झाली होती. एनडीएत दाखल होण्याचा निर्णय घेतल्यानंतर अनेक कामे मार्गी लागली आहेत, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट करून आम्ही एनडीएसोबत गेलो असल्याने लोकसभेच्या महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी ४५ जागा निवडून आणण्याचा आमचा निर्धार असणार आहे, असे म्हटले.

२ डिसेंबरला माजी मुख्यमंत्री व श्रीवर्धनचे सुपुत्र असलेल्या बॅरिस्टर अंतुले यांची पुण्यतिथी होती, तर ३ डिसेंबर रोजी दत्ताजीराव तटकरे यांची जयंती. या दोघांनाही उपमुख्यमंत्रीमहोदयांनी या वेळी अभिवादन केले.

खासदार सुनील तटकरे यांनीही आपल्या भाषणात सत्तेत सहभागी झाल्यानंतर काही लोक या ठिकाणी अल्पसंख्याक समाज नाराज असल्याचे सांगत फिरत होते, परंतु आम्ही विकासकामांसाठी सत्तेत गेलो आहोत. आम्ही आमचे धर्मनिरपेक्ष विचार सोडलेले नाहीत, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार अनिकेत तटकरे यांनी केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण सभेमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी कोणतेही राजकीय आरोप-प्रत्यारोप केले नाहीत. या सभेला अभूतपूर्व अशी गर्दी होती. काही दिवसापूर्वीच श्रीवर्धनमध्ये खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण यांची इंडिया आघाडीची सभा झाली होती. त्या सभेपेक्षा जास्त गर्दी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सभेला पहायला मिळाली.

# ठाणे बेलापूर मार्गावर अवजड वाहनांना बंदी

## उड्डाणपुलाच्या कामामुळे निर्णय

**नवी मुंबई : बातमीदार**

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तुर्भे स्टोअर येथे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू केले जाणार आहे. त्यासाठी पुढील दीड महिना ठाणे-बेलापूर मार्गावर अवजड वाहनांना नो एन्ट्री केली आहे.

६ डिसेंबर ते २५ जानेवारी या कालावधीसाठी ही बंदी असल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली. तुर्भे रेल्वेस्थानकापासून तुर्भे वस्तीत जाण्यासाठी कोणतेही साधन नागरिकांना नसल्याने त्यांना रस्ता ओलांडून जावे लागते. त्यामुळे या भागात अनेक अपघात झाले आहेत. त्यामुळे या भागातून अनेकदा वाहने हळू जात असल्याने अनेकदा वाहतूक कोंडी होते.

६ डिसेंबरपासून उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू केले जाणार आहे. हे बांधकाम पूर्ण होईपर्यंत ठाणे-बेलापूर मार्गावरील पावणे गाव येथील अग्निशमन जंक्शन ते बेलापूरकडे जाणाऱ्या मार्गावर अवजड वाहनांना बंदी केली आहे.

**पर्यायी व्यवस्था कोणती?**

अवजड वाहनांना अग्निशमन जंक्शनपासून डावीकडे वळण घेत एमआयडीसीमार्गे जाता येणार आहे. त्याचप्रमाणे तुर्भे नाक्याहून इंदिरानगर सर्कल येथून अमाईन्स कंपनीकडे जाणारी वाहतूकसुद्धा या काळात बंद राहणार आहे. त्यासाठी या मार्गाने जाणाऱ्या वाहनांना इंदिरानगर सर्कल येथून डावीकडे वळण घेऊन जाता येणार आहे. तुर्भे नाक्याहून हनुमाननगर टी पॉईंट येथून उजवीकडे वळसा घेऊन जाणाऱ्या वाहनांना या कालावधीत प्रतिबंध घातला आहे. त्याऐवजी डावीकडे वळण घेऊन जाता येणार आहे, तसेच उरणफाटा ब्रिजखालून एमआयडीसीमार्गे जाणाऱ्या वाहनांना बंदी असणार आहे. त्यासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन वाहतून नियंत्रण विभागाने केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगायचे असतात -पद्मश्री दादा इदाते



(छाया : प्रफुल्ल कांबळे)



पनवेल : प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगायचे असतात सांगायचे नसतात असे प्रतिपादन संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना लेखक, प्रभावी वक्ता व सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री दादा इदाते यांनी रविवारी पनवेल येथे संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच पुरस्कृत सधम्म सामाजिक संस्था आणि विवेक विचार मंच पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३) आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात केले.

खांदा कॉलनी येथील श्री कृपा हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रशांत ठाकूर, प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री दादा इदाते, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक व राजकीय विश्लेषक डॉ. जी. के. डोंगरगावकर, सुभाष कांबळे, महेश पौहनेकर, विजय वेदपाठक, धनराज विसपुते, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका वृशाली वाघमारे, राजश्री वावेकर, अविनाश गायकवाड, सचिन गायकवाड आदी उपस्थित होते.

या वेळी पद्मश्री दादा इदाते यांनी आपल्या देशात एवढे वर्षे संविधान असून ही ते समाजात रुजले नाही कारण एखाद्या विषयाला प्राधान्य दिल्याशिवाय तो लोकाभिमुख होत नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान लोकांपर्यंत पोहचवण्याचा निर्णय घेतला. प्रथम त्यांनी खासदारांना संविधान म्हणजे काय हे समजावून सांगितले. डॉ. बाबासाहेब हा भाषणाचा विषय नसून चिंतन आणि व्यवहाराचा विषय आहे. महात्मा गांधींनी त्यांचे नाव सुचवल्याने त्यावेळी पंडित नेहरूंनी त्यांना घटना समितीत घेतले. तेथे त्यांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड केली. त्या समितीतील सात सदस्यांपैकी बाबासाहेब आणि टी.टी. कृष्णम्मचारी हे दोघेच शेवट पर्यंत होते. त्यांनी अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास करून आपल्या देशातील प्रत्येकाला न्याय मिळवा अशी घटना तयार करताना लोकांच्या २४७३ सूचना ही विचारात घेतल्या. यामध्ये मुख्यत: देशाचे सार्वभौमत्व, लोकशाइ राज्य व्यवस्था, राष्ट्रपती, संसदीय व्यवस्था व न्याय पालिका व मूलभूत हक्क यामध्ये समानता स्वातंत्र्य शोषण विरोधी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि घटनात्मक हक्क यांचा समावेश होता. यामध्ये घटनेच्या ढाच्याला हात न लावता घटनेत दुरूस्ती करता येते हे त्यांनी आवर्जून संगितले. या वेळी त्यांनी आरक्षणाबाबत चर्चा सुरू असताना सरदार पटेल यांनी ते २५ वर्षे असावे असे सुचवले. त्यावेळी बाबासाहेबांनी त्यावेळी आपण नसू म्हणून १० वर्षे द्या. नंतर पुढील शासन परिस्थिति पाहून ठरवेल असे सांगून १० वर्षे आरक्षण दिले होते, असे सांगितले.

डॉ. जी. के. डोंगरगावकर यांची संविधानाबद्दल अनेक मते असून राजकीय हेतूने संभ्रम निर्माण केला जातो हे योग्य नाही, कारण ते तयार करताना लोकांच्या सूचना विचारात घेण्यात आल्या होत्या. देश एकसंध राहण्याचे आव्हान आहे. हिंदू धर्मातील ब्राम्हण व इतर जातींचा ही अवमान करणाऱ्यास शिक्षा झाली पाहिजे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या विशाल खंडप्राय देशाची घटना आपल्याला माहीत हवी. त्यामुळे समाजाचे जागृत घटक म्हणून आपण संविधानाची माहिती करून घेतली पाहिजे व इतरांना दिली पाहिजे असे सांगून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यासाठी प्रयत्न करीत आहेत त्यांना साथ दिली पाहिजे. पनवेल परिसरात कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण पैशावाचून थांबणार नाही, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

आयोजकांच्या वतीने संविधान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. परीक्षक सोमेश कोलगे, तन्मय तेंडुलकर व अंकित आंबवणे यांचा ही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. सीमा कांबळे यांनी केले.

### वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस

**वक्तृत्व स्पर्धेत पाचवी ते सातवी, आठवी ते बारावीचे विद्यार्थी आणि ३० वर्ष वयोगटाखालील महिला व पुरुष यांनी सहभाग घेतला होता. पाचवी ते सातवी वयोगटातील प्रथम तृप्ती पात्रो, द्वितीय शताक्षी दशपुते, तृतीय रिषिका जैन, उत्तेजनार्थ स्वरा पाटील, वेदांत शिंदे; आठवी ते बारावी वयोगटातील प्रथम निधी म्हेतर, द्वितीय यश महामुणकर, तृतीय काम्या विश्वकर्मा, उत्तेजनार्थ खुशी चौधरी, वैष्णवी मिश्रा आणि ३० वर्ष वयोगटाखालील प्रथम साशा वैनगंकर, द्वितीय पंकज पांडुळे, तृतीय डॉ. स्नेहा साबळे, उत्तेजनार्थ प्रिया चौधरी, अक्षदा माळी या सर्व विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**

# अधिवक्ता परिषदेची रायगड जिल्हा बैठक

(छाया : अक्षय शार्दुल)



पनवेल : रामप्रहर वृत्त

अधिवक्ता दिवसाचे औचित्य साधून अधिवक्ता परिषदेची रायगड जिल्हा बैठक रविवारी (दि. ३) झाली. या बैठकीचे आयोजन पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे करण्यात आले होते.

या वेळी रायगड जिल्हा अधिवक्ता परिषदेची कार्यकारणी घोषित करण्यात आली. तसेच तालुक्यानुसार रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची कार्यकारणी घोषित करण्यात आली.

या वेळी या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व सत्र न्यायाधीश दुर्गाप्रसाद देशपांडे, अधिवक्ता परिषद कोकण प्रांत महामंत्री आकाश कोटेचा, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण समिती सदस्या प्रिया लोवलेकर, अधिवक्ता परिषद कोकण प्रांत उपाध्यक्ष प्रकाश सालसिंगीकर, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ उपस्थित होते.

# उरणमध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद



उरण : बातमीदार

अनिरुद्धाज अँकडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट उरण अंतर्गत सदगुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण व मुळेखंड केंद्र या उपासना केंद्राच्या सहयोगाने रविवारी (दि. ३) सकाळी ९ ते सायंकाळी ४:३० या वेळेत उरण नगर परिषद शाळा क्र.१, पेंशनर पार्क समोर, उरण शहर येथे भव्यदिव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

राज्यात दरवर्षी होणारा रक्ताचा तुटवडा व रक्ता अभावी होणारे मृत्यूचे वाढते प्रमाण लक्षात घेता दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. दरवर्षीप्रमाणेही उरणमध्ये यावर्षीही रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. एकूण १६७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सद्गुरु श्री अनिरुध्द उपासना केंद्र उरण व मुळेखंड उपासना केंद्रांच्या सर्व भाविक भक्तांनी विशेष मेहनत घेतली. या रक्तदानामुळे रक्ता अभावी होणारे मृत्यूचे प्रमाण कमी होणार आहे. आपतकालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध होणार आहे.

या रक्तदानामुळे अनेकांचे यामूळे जीव वाचणार आहेत. त्यामूळे अनिरुद्धाज अकॅडमी मॉक डिझास्टर मॅनेजमेंट, सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण व मुळेखंड उपासना केंद्राने आयोजित केलेला रक्तदान शिबिराचा कार्यक्रम सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी व आदर्श आहे.

# उलव्यातील केमिस्ट असोसिएशन सन्मानित



उरण : बातमीदार

महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल एमपीएसीच्या वतीने उत्कृष्ट जागतिक औषधनिर्माता दिन साजरा करणारा फार्मासिस्ट किंवा संस्था, संघटना, कॉलेजेस, औद्योगिक, शासकीय/निमशासकीय औषध निर्माण अधिकारी, वैद्यकीय प्रतिनिधी मधुन विशेष सन्मानाचे मानकरी विभागनिहाय काढले होते. त्यात मुंबई विभागातून जि रायगड व संस्था गटातुन उलवे केमिस्ट असोसिएशन यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र देऊन एमएससीडीएचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलचे अध्यक्ष अतुल अहीरे व उपाध्यक्ष धनंजयजी जोशी, रजिस्टार सायली मसाळ यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी कौन्सिलच्या कार्यकारिणी सदस्या सोनाली पडोळे सदस्य नितिन मनियार, मनोहर कोरे व डीआयसीचे अध्यक्ष गणेश बंगळे, ठाणे जिल्हा अध्यक्ष दिलीप देशमुख, कल्याण केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सागर कुळकर्णी व अंबरनाथ केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय जुमानी उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी उलवे केमिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षा व रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य सीमा पाटील यांनी विशेष सन्मानामुळे माझी व उलवे असोसिएशनची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे सांगितले व फार्मसी कौन्सिलचे आभार मानले.

आरोग्य क्षेत्रात कार्यरत राहून विविध आरोग्य शिबीरे, आरोग्य विषयक जनजागृती आदी कामे उत्तमरित्या केल्याने केमिस्ट असोसिएशन उलवे संघटनेचा सत्कार झाला आहे. त्यांना प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आल्याने केमिस्ट असोसिएशन उलवे संघटनेच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांवर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा



**कळंबोली : पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब'च्या माजी सभापती प्रमिला पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दोन दिवसीय नवीन मतदार नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ३५०पेक्षा जास्त लोकांची मतदान कार्ड नोंदणी करण्यात आली. या वेळी भाजप शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी सभापती प्रमिला पाटील आदी उपस्थित होते.**

# चिरनेरमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार व आरोग्य शिबिर



उरण : प्रतिनिधी, वार्ताहर

नेरूळ येथील डी.वाय.पाटील दिम टू बी युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ नर्सिंग महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे ग्रामीण पुनर्रचना आरोग्य सेवा श्रमसंस्कार, सात दिवसीय निवासी शिबिर उरण तालुक्यातील चिरनेर येथे डी. वाय. पाटील संस्थेचे संस्थापक विजय ज्ञानेश्वर पाटील, उपाध्यक्षा शिवानी पाटील, कुलगुरू डॉ. वंदना मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली २८ नोव्हेंबर २०२३ पासून हे शिबिर सुरू झाले आहे.

शिबिराचे उद्घाटन प्राचार्या दिपा रेड्डी, उपसरपंच सचिन घबाडी, ग्रामविकास अधिकारी महेश पवार, सुधीर केणी, महागणपती मेडिकलच्या संचालिका सोनाली पाटील यांच्या मुख्य उपस्थितीत करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रसाद मच्छिंद्र कानवडे, कार्यक्रम आधिकारी प्रा. सेरीना थिओडोर, सहकारी प्रा. अंजली यादव, तसेच अध्यक्ष सुशील वैष्णव, उपाधक्ष शितल झंगळे, खजिनदार प्रांजल घाडगे, निवृत्त समन्वयक कुणाल जैसवाल, प्रशासक न्सी चेरियन, दीक्षा शर्मा, गटप्रमुख श्वेता साळुंखे, दत्तात्रय सुमभे, सानिका पालवणकर, हेंना एलसा ही सर्व मंडळी शिबिराची जबाबदारी पार पाडत आहेत.

शिबिरात एकूण ६० शिबिरार्थी सहभागी झाले आहेत. शिबिरातील मुख्य उपक्रम म्हणजे ग्राम आरोग्य सर्वेक्षण, सामाजिक सेवा श्रमदान, बाल माता आरोग्य सर्वेक्षण, वृक्षारोपण, अंधश्रद्धा निर्मूलन, राष्ट्रीय एकात्मता, व स्वच्छता जनजागृती हे मुख्य उपक्रम असून, श्रमदानांतर्गत शिबिरार्थींनी चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील तलाव, विहिरीचा परिसर तसेच श्री महागणपती मंदिर परिसर आणि अक्कादेवी परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला.

एड्स या भयावह रोगाविषयी समाज प्रबोधन व जनजागृती व्हावी यासाठी रॅली काढण्यात आली. त्याचबरोबर कमी वयात लग्न केल्याचे दुष्परिणाम आणि बालमाता संगोपन यातून आदिवासी बांधवांना पथनाट्यातून आरोग्य विषयी जनजागृती व प्रबोधन केले. तसेच डेंगू, मलेरिया, पल्स पोलिओ निर्मूलन, तसेच स्वच्छ भारत अभियान, स्त्री पुरुष समानता बेटी बचाव बेटी पढाव याविषयी देखील विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून जनजागृती केली. दरम्यान ग्रामपंचायत हद्दीतील ३०० रहिवाशी नागरिकांच्या घरांना भेटी देऊन, शिबिरार्थींनी सामाजिक व आरोग्य विषयक सर्वेक्षण केले.

सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्य परिसर स्वच्छता याबाबत शिबिरार्थींनी अद्यावत माहिती गोळा करून त्याविषयीचे मार्गदर्शनही केले. प्राथमिक शाळा चिरनेर येथील २३२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना पोषण आहार देण्यात आला. तर अक्कादेवी आदिवासी वाडीतील आदिवासी बांधवांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. नाट्य दिग्दर्शक संतोष ठाकूर, निवृत्त क्लास वन अधिकारी श्रीधर मोकल, माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र मुंबईकर यांच्या सहकार्याने इंद्रायणीच्या डोंगरावर विविध जातीची झाडे लावून, याआधी वृक्षारोपण करण्यात आलेल्या २०० झाडांना शिबिरार्थींनी पाणी दिले.

# इनरव्हील क्लबतर्फे विविध उपक्रम



पनवेल : वार्ताहर

आपली सामाजिक बांधिलकी जपत इनरव्हील क्लब ऑफ गॅलक्सी न्यू पनवेलने पनवेल आणि विविध भागांमध्ये सामाजिक उपक्रम राबविले.

इनरव्हील क्लब ऑफ गॅलक्सी न्यू पनवेलवतीने पनवेल तालुक्यातील फणसवाडी येथे फळझाडांची लागवड करून त्यांच्या देखरेखीची सोय करण्यात आली तसेच पळसदारी येथे सिटीझन युनिटी फोरम (सीयुएफ)च्या संयुक्त विद्यमाने १२० आंबा व इतर फळझाडांची लागवड करण्यात आली. या वेळी क्लबच्या अध्यक्ष डॉ. शितल फरांदे यांच्यासह कल्पना कोठारी, उल्का धुरी, साधना धारगळकर, सुनिता कांडपिळे, शितल वळंजू व इतर अनेक मान्यवर सदस्या उपस्थित होत्या.

क्लबतर्फे हॅप्पी स्कूलसाठी निवडलेल्या न्यू इंग्लिश स्कूल, मार्केट यार्ड, पनवेल या शाळेला एक हजार लिटर पाण्याची टाकी बसवून देण्यात आली. इंटर डिस्ट्रिक्ट प्रोजेक्ट म्हणून नाशिकमधील पाच मतिमंद मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली.

क्लबने रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेल ब्लड बँकेला ११ हजार रकमेचा चेक मदत म्हणून डोनेट केला. परमशांती वृद्धाश्रम, तळोजा येथील जेष्ठ नागरिकांसाठी संगीत आणि गाण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. क्लबच्या सदस्य संविधा पाटकर आणि त्यांचे सहकारी यांनी नवी, जुनी हिंदी मराठी गाणी गायली. ज्येष्ठ नागरिकांनीसुद्धा गाणी गाऊन व नृत्य करून या कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद लुटला. या वेळी सदस्यांनी केळी,बिस्किटे, किराणासामान ज्येष्ठांना दिले तसेच क्लबच्या सदस्य कल्पना कोठारी यांनी ज्येष्ठ स्त्रियांसाठी गाऊन व साड्यांचे वाटप केले व वृद्धांना शर्ट पँट देण्यात आल्या तसेच गोकुळाष्टमीनिमित्त सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील सुनिता कांडपिळे यांनी आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना भोजन दिले.

क्लबतर्फे रोटरी कम्युनिटी सेंटर, पनवेल येथील मूकबधिर मूलांच्या शाळेत क्लबच्या एडिटर शितल वळंजू यांनी तेथील मुलांना आकाशकंदील व भेटकार्ड बनविण्याची कार्यशाळा घेतली रॉबिन हूड आर्मी असोसिएशन स्कूल येथे रोटरी क्लब ऑफ होरिझनच्या संयुक्त विद्यमाने, डेंटल चेकअप कॅप आयोजित केला होता.

## संपादकीय

# मोदी लाट कायम

लोकसभेची सेमिफायनल म्हणून पाहिल्या जाणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. निकाल जाहीर झालेल्या चारपैकी तीन राज्यांत भाजपने विजय मिळविला. यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

**पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीने प्रतिष्ठेच्या केल्या होत्या. एवढे पक्ष एकत्र आल्याने आता आम्हीच जिंकणार असा त्यांचा अविर्भाव होता. अर्थात, या आघाडीत कुरबुरी सुरू झाल्या असून काँग्रेस घटक पक्षांना डावलत असल्याच्या तक्रारी आहेत. तरीदेखील काँग्रेसने सर्वकाही रेटून नेत भाजपला शह देण्याचा प्रयत्न केला, मात्र एवढे पक्ष एकवटूनदेखील भाजपला मात देता आली नाही. उलट भाजपने मध्य प्रदेश राखतानाच राजस्थान आणि छत्तीसगड ही राज्ये काँग्रेसकडून हिसकावून घेतली आहेत, तर तेलंगणामध्ये बीआरएसची पीछेहाट होऊन काँग्रेसने बस्तान बसवले आहे. उर्वरित मिझोराम राज्यातील मतमोजणी व निकाल सोमवारी आहे. चार राज्यांचा निकाल भाजपसाठी आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने फायदेशीर ठरणारा आहे. या राज्यांमध्ये लोकसभेच्या मोठ्या प्रमाणात जागा आहेत. हिंदी भाषक पट्ट्याचा कौल भाजपच्या बाजूने लागला असल्याने लोकसभेचा जादुई आकडा गाठताना कमळ फुलण्यासाठी अनुकूल वातावरण असेल. दुसरीकडे काँग्रेसने राज्यस्थान आणि छत्तीसगड ही राज्ये गमावली असून एकमेव तेलंगणात पाय रोवले आहेत. उत्तर भारताच्या तुलनेत दक्षिणेतील लोकसभेच्या जागा कमी आहेत. त्याचप्रमाणे दक्षिण भारतात प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व आहे. त्यामुळे तेलंगणात काँग्रेसने विजय मिळविला असला तरी उत्तरेतील हार त्यांना आत्मचिंतन करायला लावणारी आहे. काँग्रेसने आपले घोडे पुढे दामवटत या निवडणुका लढविल्याने इंडिया आघाडीतील समाजवादी पक्षांसारखे सहकारी नाराज झाले होते. आघाडीतील वाद निकालानंतर चव्हाट्यावर आल्यास आश्चर्य वाटायला नको. शिवाय विधानसभा निवडणुकांमध्ये दिलेल्या सापत्न वागणुकीची परतफेड घटक पक्ष लोकसभा निवडणुकीत करतील हे वेगळे सांगायला नको. तसे झाल्यास ते काँग्रेसला जड जाऊ शकते. कधी काळी देशात सर्वांत मोठा असलेला काँग्रेस पक्ष २०१४पासून उतरणीला लागला आहे. राहुल गांधी यांचे नेतृत्व काँग्रेसला धार्जिणी नसल्याने बिगरगांधी घराण्यातील अध्यक्ष केला गेला. असे असले तरी पक्षाची सर्व कमान सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याकडेच आहे. राहुलबाबांच्या भारत जोडो यात्रेनंतर काँग्रेसला चांगले दिवस येणार असे मानले जात होते, मात्र पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये देशात केवळ मोदी हा एकच ब्रँड कायम चालतो हे सिद्ध झाले आहे. पंतप्रधान मोदींची क्रेझ, केंद्रीय मंत्री अमित शाह यांची चाणक्यनीती, त्याला इतर नेत्यांची जोड, त्या त्या राज्यांतील नेते, पदाधिकाऱ्यांचे नियोजन आणि कार्यकर्त्यांची मेहनत या जोरावर भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीत काय होणार याची झलक दाखवून दिली आहे. भाजपने अत्यंत शिस्तबद्ध प्रचारयंत्रणा राबविली. दुसरीकडे काँग्रसने पंतप्रधान मोदींवर अत्यंत खालच्या थराला जाऊन टीका-टिपण्णी केली, जी त्यांना भोवली आहे. मागील गुजरात विधानसभा निवडणुकीच्या वेळीही राहुल गांधींनी अशाच प्रकारे पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले होते. तिच चूक त्यांनी पुन्हा केली. त्यांच्याकडून आणखी काय अपेक्षा करणार? पंतप्रधान मोदी मात्र लोकसभेसाठी नव्या जोमाने सज्ज होत आहेत.**

# कर्जत शहरातील वाहतूक कोंडी सुटेना!





**खबरबात**
विजय मांडे

कर्जत शहरात वाहतूक कोंडी होण्याचे कारण म्हणजे कुठेही उभ्या करण्यात येणाऱ्या रिक्षा आणि बाजारपेठेतील दुतर्फा असलेले हातगाडीवाले आणि फेरीवाले. या सर्वांमुळे कर्जतच्या बाजारपेठेतच नव्हे तर शहरातून चालणे कठीण होत आहे. त्यांच्यावर कुणाचाच वचक नाही. असा सूर कर्जतकरांकडून ऐकायला मिळतो, परंतु अनेकजण याबाबतीत पाठपुरावा करतात त्याला यश येत नाही. दिवसेंदिवस शहरातील वाहतुक कोंडी डोकेदुखी ठरत आहे. सणा सुदाला बाजारपेठेत एकच गर्दी होत असते.

कर्जत ग्रुप ग्रामपंचायत असताना रस्ते फार लहान होते. ते रुंदीकरण करण्याचे काम माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे यांनी हाती घेतले होते. त्यावेळी त्यांना खूप विरोध झाला होता. त्याला न जुमानता रस्ते थोडेसे रुंद झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण हे रस्ते त्यावेळीदेखील म्हणजे ३५ ते ४० वर्षांपूर्वी हातगाडी वाल्यांनी काबीज केले होते. त्यानंतर कर्जत ग्रुप ग्रामपंचायत आणि दहिवली ग्रामपंचायतीची एकत्रित कर्जत नगर परिषद जाहीर झाली. त्यामध्ये शिरसे ग्रामपंचायतीतील आकुरर्ले गावाचाही समावेश करण्यात आला होता. ही घटना १९९२ सालची. त्यानंतर १९९४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आली. त्यानंतर १९९९ साली काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी झालेल्या निवडणुकीत सुरेश लाड आमदार झाले.

तत्कालीन सुरेश लाड यांनी शहरातील रस्ते काँक्रीट करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला व शहरातील रस्ते रुंद करण्यासाठी स्वतः लक्ष घातले. त्यावेळीही व्यापारी वर्गाने नाराजी दाखविली होती. त्यांना समजावून तर काहींचा विरोध पत्करून त्यांनी दोन्ही बाजारपेठा व शहरातील काही रस्त्यांचे रुंदीकरण घडवून आणले. रस्ते मोठे झाले मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजारपेठेतील रस्त्यांच्या दुतर्फा हातगाडी व फेरी वाल्यांनी ठाण मांडले. खरे तर नगर परिषद परवाना असलेल्या हातगाड्या किती? आणि प्रत्यक्षात हातगाड्या किती? काही वर्षांपूर्वी नगरसेवकांच्या नावावरसुद्धा हातगाड्या होत्या. हा म्हणजे संशोधनाचा विषय आहे. त्यांच्यावर ठोस कारवाई केल्याचे ऐकीवात नाही. कुणीतरी विरोध केला की, तात्पुरती मलमपट्टी करण्याचे प्रकार होत असतात, मात्र काही दिवसांनी 'जैसे थे, परिस्थिती होते. विविध शासकीय खात्याच्या अधिकाऱ्यांनी, नागरिकांनी आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन शहरातील वाहतूक कोंडीवर तरच मार्ग निघेल...

कपालेश्वर मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दरम्यानच्या रस्त्यावर नो हॉकर्स झोन करण्याचे ठरले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर हातगाडीला बंदी घालण्यात आली होती. हा ठराव करताना त्यावेळी जे नगरसेवक होते. त्यातील दोन - तीन नगरसेवक आत्ता सुद्धा नगर परिषदेत आहेत, मात्र याबाबत ते काहीही करू शकत नाहीत. मध्यंतरी या रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करून त्यांना उठवण्यात आले होते मात्र मतांच्या राजकारणासाठी त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप झाला आणि ही कारवाई तीन-चार दिवसांचीच ठरली. आता तर त्या रस्त्यावरून चालणेही कठीण होऊन बसले आहे. आम्ही ज्यांना निवडून दिले. त्यांनी हे काम केले पाहिजे. अशी उघड चर्चा नेहमीच होत असते, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात त्यात भर म्हणून शासनाने रिक्षा परवाने खुले केले त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात. दररोज रिक्षा चालक आणि अन्य वाहनधारक यांची भांडणे होत असतात, मात्र एक आहे ज्यावेळी आरटीओंचा कॅम्प असतो तेंव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. काही महिन्यांपूर्वी टोविंग वॅन उपलब्ध होती, मात्र पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारीही कमी आहेत. त्यामुळे त्याचाही नाईलाज आहे. टोविंग वॅन सुरू असताना चांगली शिस्त लागली होती. वाहतूक कोंडीची समस्याही बऱ्या पैकी सुटली होती, मात्र आता सारे पुन्हा सुरू झाले आहे.

हातगाडी व फेरीवाले यांच्यासाठी एक वेगळेच ठिकाण ठरवून त्यांची व्यवस्था करायला हवी. कोरोनाच्या काळात या सर्वांना पोलीस मैदानात व्यवस्था करून दिली होती. त्यावेळी सर्वांना सोयीस्कर झाले होते. त्यावेळी दिवसाही बाजारातील रस्ता खूप मोठा आहे. हे पहायला मिळत होता. दुसरा उपाय म्हणजे चारचाकी गाड्या बाजारपेठेत येऊ न देणे. ठरवलेले एक दिशा मार्ग अंमलात आणणे. याबाबत तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी यांची स्वच्छता अभियानाच्या वेळी चर्चा झाली. त्यावेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी सुद्धा उपस्थित होत्या, मात्र अद्याप त्यावर सविस्तर चर्चा झाली नाही. या विविध शासकीय खात्याच्या अधिकाऱ्यांनी, नागरिकांनी आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन शहरातील वाहतूक कोंडीवर मार्ग निघेल.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर अजिबात करू नका 'या' चुका

व्हॉट्सॲप अत्यंत लोकप्रिय आहे. हे ॲप आल्यापासून टेलिकॉम कंपन्यांकडून देण्यात येणाऱ्या टेक्स्ट मेसेजचा वापर कमी झाला आहे. जर व्हॉट्सॲपने तुम्हाला बॅन केलं किंवा तुम्ही या मेसेजिंग ॲपच्या सेवेचा लाभ घेऊ शकत नसाल तर काय होईल याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? एका चुकीमुळे असं नक्कीच घडू शकतं. व्हॉट्सॲप अकाऊंट बॅन होऊ शकतं. त्याबद्दल जाणून घेऊया...



**स्पॅम मेसेजपासून राहा दूर**

व्हॉट्सॲप युजर्सनी स्पॅम मेसेजपासून दूर राहावं. तुम्ही मेसेजिंग ॲप्सवर ग्रुप्स किंवा ब्रॉडकास्टिंगद्वारे सतत स्पॅम मेसेज शेअर करत असाल, तर यामुळे तुमच्यावर बंदी येऊ शकते.

**खोट्या बातम्या शेअर करू नका**

व्हॉट्सॲप युजर्सनी नेहमीच खोट्या बातम्या शेअर करणं टाळावं. अनेक युजर्स माहिती चेक न करता एखादा मेसेज अनेक व्हॉट्सॲप ग्रुप्समध्ये शेअर करतात. असं करणं केवळ समाजासाठी धोकादायक ठरू शकत नाही, तर तुमचं अकाऊंटही बॅन होऊ शकतं.

**पोर्नोग्राफीपासून दूर राहा**

जर तुम्ही जाणूनबुजून किंवा नकळत पोर्नोग्राफीशी संबंधित क्लिप किंवा फोटो इमेज व्हॉट्सॲपवर कोणाला शेअर करत असाल तर अडचणीत येऊ शकता.

**खोटे नाव आणि फोटो वापरू नका**

व्हॉट्सॲप युजर्सनी जाणूनबुजून दुसऱ्याचा फोटो आणि नाव वापरू नये. एखाद्या सेलिब्रिटी किंवा खेळाडूचा फोटो टाकला तर ती वेगळी गोष्ट आहे. जर तुम्ही एखाद्या सामान्य व्यक्तीचा फोटो फसवणूक करण्यासाठी किंवा एखाद्याचे नुकसान करण्यासाठी वापरत असाल तर यामुळे तुमचे अकाऊंट बॅन केलं जाईल.

**थर्ड पार्टी ॲप्स वापरणे टाळा**

जर युजर्स WhatsApp Delta, GBWhats-pp, WhatsApp Plus असे इतर Apps वापरत असतील, तर तुमचं WhatsApp अकाऊंट कायमचं बंद केलं जाऊ शकतं. जर अनेक युजर्सने तुमच्या WhatsApp अकाऊंटची तक्रार केली तर तुमचं अकाऊंट बॅन केलं जाऊ शकतं.

# आज भारतीय नौदल दिन

१९७१ मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध जिंकलेल्या भारतीय नौदलाचे सामर्थ्य आणि शौर्य लक्षात ठेवण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी भारतीय नौदल दिन साजरा केला जातो.

४ डिसेंबर १९७१ रोजी 'ऑपरेशन ट्रायडंट' अंतर्गत भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची नौदल तळावर हल्ला केला. या ऑपरेशनचे यश लक्षात घेऊन दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. जंग-ए-आझादी, मुंबईतील ऑपरेशन ताजपासून ते इतर अनेक घटनांपर्यंत भारतीय नौदलाचा इतिहास कर्तृत्वाने भरलेला आहे.

नौदल ही भारतीय लष्कराची सागरी शाखा आहे, जी १६१२ मध्ये स्थापन झाली. ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या जहाजांचे संरक्षण करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनी मरीन म्हणून एक सैन्य उभे केले, ज्याचे नंतर रॉयल इंडियन नेव्ही असे नामकरण करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, १९५० मध्ये नौदलाची पुनर्रचना करण्यात आली आणि तिचे भारतीय नौदल असे करण्यात आले.

या दिवशी अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले जातात आणि दरवर्षी नौदल दिन साजरा करण्यासाठी वेगळी थीम ठरवली जाते. नौदल दिन त्याचा इतिहास आणि त्याचे महत्त्व याबद्दल



**निमित्त**

अधिक जाणून घेऊयात.

भारतीय नौदल दिनाचा इतिहास

जगातील पाचव्या क्रमांकाच्या या नौदलाने १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धात पाकिस्तानच्या कराची बंदरावर जोरदार बॉम्बफेक करून उद्ध्वस्त केले. ४ डिसेंबर १९७१ रोजी ऑपरेशन ट्रायडंट नावाने सुरू करण्यात आलेल्या मोहिमेत मिळालेल्या यशामुळे दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. १९४५ पासून दुसऱ्या महायुद्धानंतर १ डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जात होता, मात्र नंतर तो १५ डिसेंबर १९७२ पर्यंत साजरा करण्यात आला, त्यानंतर १९७२ पासून फक्त ४ डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जात आहे. नौदल दिनाच्या दिवशी भारत-पाकिस्तान युद्धात मारले गेलेल्यांचे स्मरण केले जाते आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. भारतीय नौदल ही भारतीय सशस्त्र दलांची नौदल शाखा आहे ज्याचे नेतृत्व भारताचे राष्ट्रपती कमांडर-इन-चीफ म्हणून करतात. मराठा सम्राट, छत्रपती शिवाजी महाराजांना भारतीय नौदलाचे जनक मानले जाते.

भारतीय नौदलाची स्थापना १६१२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने केली होती. नंतर त्याला रॉयल इंडिया नेव्ही असे नाव देण्यात आले आणि स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये भारतीय नौदल म्हणून त्याची पुनर्रचना करण्यात आली. पाकिस्तानविरुद्धच्या विनाशकारी युद्धानंतर संपूर्ण देशाने भारतीय नौदलाच्या यशाचा जल्लोष साजरा केला.

भारतीय नौदलाची सुरुवात ईस्ट इंडियाच्या काळात झाल्याचं मानण्यात येतं. ईस्ट इंडिया कंपनीनं आपल्या व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी नौदलाची एक टीम तयार केली. नंतर याचं नामकरण रॉयल इंडियन नेव्ही असं करण्यात आलं. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५० साली रॉयल इंडियन नेव्ही हे नाव बदलण्यात आलं आणि भारतीय नौदल अर्थाच इंडियन नेव्ही असं ठेवण्यात आलं.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



सातारा : हिवाळ्यात मोकळ्या माळरानात शेतकऱ्यांची गुरे दिवसभर चरायला सोडली जातात. (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# पुरूषांनाही होऊ शकतो स्तनाचा कर्करोग

स्तनाचा कर्करोग हा बहुधा चुकीच्या समजुतीने आजार मानला जातो जो केवळ महिलांनाच लक्ष्य करतो. तथापि, पुरुष देखील या स्थितीला बळी पडू शकतात, जरी हे तुलनेने दुर्मिळ आहे. पुरुष स्तनाच्या कर्करोगाविषयी जागरुकता महत्वाची आहे, कारण लवकर निदान केल्याने परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होऊ शकते. पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग होण्याची शक्यता, त्याची लक्षणे आणि ते स्त्रियांपेक्षा कसे वेगळे असतात हे जाणून घ्या.

**कर्करोगाचा धोका वाढविणारे घटक**

होय, पुरुषांना खरंच स्तनाचा कर्करोग होऊ शकतो. जरी स्त्रियांच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी आहे. स्तनाची ऊती दोन्ही लिंगांमध्ये असते आणि पुरुषांमध्ये ती कमी असते. तरीही या ऊतींमधील पेशी कर्करोगग्रस्त होऊ शकतात. स्तनाचा कर्करोग होण्याचा पुरूषांना आजीवन धोका १००० पैकी १ असतो, जो स्त्रियांसाठी ८ पैकी १च्या तुलनेत त्याची दुर्मिळता दर्शविते. वाढत्या वयात पुरुषांना स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढवणारे घटक, प्रोस्टेट कर्करोगासाठी हार्मोन थेरपी किंवा इस्ट्रोजेन असलेली औषधे, लठ्ठपणा, स्तनाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास आणि अंडकोषांवर परिणाम करणारे रोग.

पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे : पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे महिलांसारखीच असतात आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

लम्प किंवा घट्ट होणे: सर्वात सामान्य लक्षण म्हणजे वेदनारहित ढेकूळ किंवा स्तनाच्या ऊतीमध्ये घट्ट होणे.

त्वचेतील बदल: स्तनाचा कर्करोग असलेल्या पुरुषांना स्तन झाकणाऱ्या त्वचेत लालसरपणा, मुरगळणे किंवा फुगणे यांसारखे बदल दिसू शकतात.

स्तनाग्र बदल: स्तनाग्र स्त्राव, उलटणे किंवा मागे घेणे हे स्तनाच्या कर्करोगाचे सूचक असू शकते.

वेदना: स्तनाचा कर्करोग सामान्यतः वेदनादायक नसला तरी, काही पुरुषांना स्तनाच्या भागात अस्वस्थता जाणवू शकते.

**पुरुष आणि स्त्रियांतील लक्षणांमधील फरक**

लक्षणे मोठ्या प्रमाणात सारखी असली तरी, स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग कसा प्रकट होतो यात काही फरक आहेत. पुरुषांना नंतरच्या टप्प्यावर निदान केले जाते, कारण ते त्यांच्या स्तनाच्या ऊतींमधील बदलांबद्दल तेवढे जागरूक नसतात. याव्यतिरिक्त, पुरुषांमध्ये स्तनाच्या कर्करोगाच्या दुर्मिळतेमुळे जागरुकतेचा अभाव होऊ शकतो, ज्यामुळे वैद्यकीय लक्ष वेधण्यात विलंब होऊ शकतो.

स्तनाचा कर्करोग हा असामान्य असला तरी तो होऊ शकतो आणि होऊ शकतो हे ओळखणे आवश्यक आहे.

# कर्जतच्या श्रीराम पुलाला धोका

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या आमराई परिसरातील श्रीराम पुलाला धोका निर्माण झाला आहे. १९६०च्या दशकात बांधण्यात आलेल्या या पुलाच्या खांबांवर झाडे उगवली आहेत. ती झाडे काढून रस्ता मोकळा करण्यात यावा, अशी मागणी दहिवली विचार मंचचे कार्यकर्ते विकास चित्ते यांनी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि पाटबंधारे विभागाने ती झाडे काढून पुलाचे आयुर्मान वाढवावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## पुलाच्या खांबांना झाडांचा विळखा



मुरबाड रस्त्याची निर्मिती झाली होती त्याच वेळी कर्जत येथे उल्हास नदीवर पूल बांधण्यात आला. त्या पुलाचे वयोमान आज ६० वर्षांच्या आसपास झाले असून त्या पुलाच्या बाजूला आणखी एक नवीन पूल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात येत आहे, मात्र सध्या कर्जत–मुरबाड रस्त्यावरील सर्वात महत्त्वाचा पूल असलेल्या कर्जत आमराई येथील पुलाचे खांब हे जंगली झाडांनी व्यापले आहेत. त्या झाडांची निर्मिती पुलाच्या खांबांवर झाली असून त्या झाडांचे मूळ आरसीसी सिमेंटने बांधकाम असलेल्या खांबांमध्ये पसरले आहेत. अशी झाडे अनेक इमारती यांना धोका पोहचवत असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे ती झाडे बाजूला करून उल्हास नदीवरील श्रीराम पुलाचे आयुष्यमान वाढवावे, अशी मागणी करणारे निवेदन दहिवली परिसर विचारमंचचे कार्यकर्ते चित्ते यांनी केली आहे.

या भागात असलेल्या पायपूलवजा बंधारे आणि नदीतील पाण्यावर अधिकार असलेल्या पाटबंधारे विभागाला विकास चित्ते यांनी निवेदन दिले आहे. त्याच वेळी या रस्त्याची देखभाल करणारी यंत्रणा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नव्याने रस्त्याची जबाबदारी गेलेल्या राज्य रस्ते विकास महामंडळ यांना चित्ते यांनी निवेदन दिले आहे. ६० वर्षांपूर्वी बांधलेल्या पुलाचे आयुष्यमान वाढविण्यासाठी शासनाच्या यंत्रणा यांनी पुलाच्या खांबांवर आणि आजूबाजूला उगवलेली झाडेझुडपे बाजूला करावीत, एवढीच त्यांची मागणी आहे. याच जुन्या पुलाच्या बाजूला शासन तब्बल पाच कोटी खर्चून नवीन पूल बांधत आहे. जुन्या पुलाची देखभाल शासन करीत नसल्याने नागरिकांनीही नाराजी व्यक्त केली आहे.

# मुंबई–पुणे महामार्गालगत कचऱ्याचे ढीग

## परिसरात दुर्गंधी; अपघाताची शक्यता

**चौक : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर दांडफाटा ते खालापूरदरम्यान न संपलेला आणि खराब झालेला भाजीपाला टाकून या रस्त्याचे डंपिंग ग्राउंड बनविण्यात आले आहे. त्यामुळे महामार्गावर कचऱ्याचे ढीग साचले असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्याचप्रमाणे अपघाताची शक्यताही वाढली आहे. त्यामुळे याबाबत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

सध्या खोपोली ते दांडफाटादरम्यान प्रवास करताना या रस्त्याच्या कडेला कुजलेला भाजीपाला टाकलेला अनेक ठिकाणी दिसून येत आहे. बाजारात न संपलेला भाजीपाला खराब झाल्याने किंवा बाजारपेठेमध्ये जाण्यास उशीर झाल्याने परतीच्या प्रवासात वाटेत टाकला जात आहे. त्यामुळे हा भाजीपाला कुजून त्याची दुर्गंधी पसरली आहे. मोकाट जनावरे हा भाजीपाला खाण्यासाठी येताना दिसतात. त्यातच त्यांच्या झुंजी लागतात. त्यामुळे रस्त्याच्या कडेला असणारी जनावरे रस्त्यावर येतात. त्यामुळे जोरदार गतीने जाणारी वाहने अचानक ब्रेक मारतात. या प्रकारामुळे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.



अनेक वेळा या ठिकाणी कचरा व भाजीपाला टाकणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची मागणी येथील आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांनी केली आहे, मात्र त्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. हा प्रकार असाच सुरू राहिला तर जुन्या मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्गाचे डंपिंग ग्राउंड होण्यास वेळ लागणार नाही आणि जनावरांच्या अपघातांचे प्रमाणही वाढताना दिसेल.

# खोपोलीत आयुष्यमान कार्डवाटप शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

विक्रम साबळे मित्रपरिवार सामाजिक संघटना आयोजित आयुष्यमान कार्डवाटप कार्यक्रम रविवारी (दि. ३) महाराजा मंगल कार्यालयात झाला. यात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

पंतप्रधान जनआरोग्य योजना आयुष्यमान भारत योजनेंतर्गत प्रतिवर्ष कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंतचा लाभ घेता येईल. या योजनेचा प्रसार व गरजूंना लाभ यासाठी शांतीनगर व परिसरातील गरीब अशा ५७७ कुटुंबांना या कार्डचे वाटप संघटनेचे अध्यक्ष विक्रम साबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संघटनेचे सदस्य शंकर दळवी, मोंतो खान, सोळंकी, राजीव पडघमकर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



केंद्र शासनाच्या या योजनेचा लाभ गरीब कुटुंबांना मिळावा यासाठी गेले तीन दिवस आम्ही महाराजा मंगल कार्यालयात शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे, असे सामाजिक कार्यकर्ते विक्रम साबळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे उपस्थित नागरिकांचे आभार मानले.

# वावंढळ येथे विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त विविध उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात विकसित भारत संकल्प यात्रा सुरू झाली असून वावंढळ येथे सरपंच सुहास कदम, सर्व सदस्य, ग्रामसेविका मंगला केदारे व ग्रामस्थांनी या रथाचे जोरदार स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारत विकास संकल्प यात्रेचा उद्देश सांगण्यात आला.



विकसित भारत यात्रा रथाचे स्वागत आणि पूजन सर्व उपस्थित महिलांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, महामानव क्रांतीसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज यांच्या प्रतिमेला सरपंच सुहास कदम व उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संकल्प विकसित भारत यात्रेनिमित्ताने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मधुमेह, रक्ततपासणी, रक्तदाब, कॅल्शियम यांची मोफत तपासणी करण्यात आली.

या वेळी आयुष्मान भारत कार्ड मोफत काढून देण्यात आले व त्यांचे वाटपही करण्यात आले. महिला बचत गटाचे सदस्य या वेळी उपस्थित होते.

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व शाळा शिक्षक, कर्मचारी, अंगणवाडीसेविका, आशासेविका, ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते. सरपंच सुहास कदम यांनी संकल्प विकसित भारतमातेची शपथ दिली. ग्रामसेविका मंगला केदारे यांनी संविधान उद्देशिकाचे वाचन केले. सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आली.

# रोहा–कोलाड मार्गावर एसटीची स्कूलबसला धडक

## नागरिकांच्या सतर्कतेमुळे जीवितहानी टळली

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा–कोलाड राज्य मार्गावर शनिवारी (दि. २) सकाळी ६.३० वाजता पहाटेच्या धुक्यात एसटी बसचालकाने सुदर्शन स्टॉपनजीक स्कूलबसला मागून धडक दिली. या अपघातात शाळेतील विद्यार्थी नागरिकांच्या सतर्कमुळे किरकोळ जखमी झाले. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

रोहा आगारातून पहाटेची ६.३० वाजता सुटणारी रोहा–फलटण–तुळजापूर (एमएच ०६ बीडब्ल्यू ८४४३) ही बस रविवारी कोलाडकडे जात होती. या एसटी बसच्या पुढे शाळेची बस (एमएच ०६ एस ९२७९) मुलांना घेऊन जात असताना तिला ओव्हरटेक करण्याच्या नादात मागून एसटी बसचालकाने या स्कूलबसला धडक दिली. त्यातच पहाटेच्या वेळी धुकेही मोठ्या प्रमाणात होते.

या धडकेत स्कूलबस सुदर्शन बसकट्ट्यावर जाऊन धडकली. या अपघातात बसमधील काही विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. नागरिकांना त्यांना सुखरूप बाहेर काढले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेचा अधिक तपास रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# मोरे महाविद्यालयात विधी साक्षरता कार्यक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी स्वत:चे करिअर घडवण्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रमाची सवय आत्मसात करणे आवश्यक असल्याचे मत महाड येथील दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश हर्षदा आदमाने यांनी व्यक्त केले.



चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये महाराष्ट्राचे माजी ग्रामविकास मंत्री कै. प्रभाकर मोरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विधी साक्षरता कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवायोजना व आजीवन अध्ययन विभाग यांच्या विद्यमाने महाड–पोलादपूर वकील संघाच्या प्रायोजकत्त्वाखाली विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर व उपप्राचार्य प्रा. सुनील बलखंडे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. ॲड. ए. ए. अंबरे यांनी, विद्यार्थ्यांनी वाहन व वाहतूकविषयक नियम व कायदे तसेच समाजमाध्यमे वापरताना घ्यावयाची काळजी याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. महिलांच्या शारीरिक व मानसिक छळाविरोधी कायद्यांबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून मनोगत व्यक्त करताना ॲड. अमितकुमार चांदोरकर यांनी, विद्यार्थ्यांना अमली पदार्थविरोधी कायदा, त्यामधील विविध तरतुदी याबद्दल सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतामध्ये शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे यांनी, भारतीय संविधान तसेच भारतीय संविधानाचे महत्त्व विषद करणारी विविध पुस्तके यांचा अभ्यास करून स्वत:बरोबरच विद्यार्थ्यांनी समाजातील विविध घटकांमध्ये कायद्यांसंदर्भात जनजागृती करावी, असे मत व्यक्त केले.

महाड दिवाणी न्यायालय व महाड–पोलादपूर वकील संघाचे ॲड. संतोष काळे यांनी सर्वांचे आभार मानले.

# रोहा येथे कृषी मेजवानी, प्रदर्शन, विक्री, परिसंवाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी (दि. ९) कृषी मार्गदर्शक दिनदर्शन २०२४चे प्रकाशन, प्रयोगशील शेतकरी, शेतीमित्र यांसह शेतीशी संबंधित व्यक्तींचा सन्मान, शेतीविषयक परिसंवाद, कृषी प्रदर्शन व विक्री अशी विविध मेजवानी अनुभवता येणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत यांनी दिली.

भाटे वाचनालयाच्या सभागृहात दिवसभर कृषी क्षेत्रातील योजना, कृषीपूरक व्यवसायिक संधी आणि सेंद्रिय शेतीविषयाच्या ज्ञानाचा लाभ मिळणार आहे. या कृषी महोत्सवाचे उद्घाटन स्मार्टचे उपसंचालक सतीश बोराडे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या हस्ते होणार आहे. आयोजित कृषी महोत्सवात कृषीसंबंधी साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

कृषी उत्पादने सेवा, कृषी विस्तार, महिला बचत गटाचा समावेश आहे. महोत्सवात कृषी योजनांची माहिती यावर कृषी अधिकारी महादेव करे, सेंद्रिय शेती विषयावर डॉ. राजेश मांजरेकर तर कृषीपूरक व्यावसायिक संधी व प्रतिक्रिया उद्योग यावर राहुल जोशी यांचा परिसंवाद आहे. दिवसभर कृषी प्रदर्शन व विक्री राहणार आहे अशी अधिक माहिती अध्यक्ष गणेश भगत यांनी दिली.

संस्थेचा वर्धापन दिन व प्रदर्शन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गणेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष अनंत भगत, सचिव पांडुरंग भेरे, संतोष दिवेकर, धनंजय जोशी यांसह पदाधिकारी, सहभागी शेतकरी विशेष परिश्रम घेत आहेत. शेतकरी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अवश्य लाभ घ्यावा, कृषी चळवळ अधिक गतिमान करावी, असे आवाहन सचिव पांडुरंग भेरे यांनी केले आहे.

# अलिबागच्या पीएनपी कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कृषी आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन पीएनपी कॉलेज येथे करण्यात आले होते.



या कार्यक्रमास पीएनपी कॉलेजचे प्राचार्य पोटे सर, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र आतनूर, तालुका क्रीडा अधिकारी सचिन निकम, परीक्षक म्हणून सोनावणे, ॲड. निहा राऊत, प्राजक्ता कोकणे, वंदना आंब्रे, ॲड. कला पाटील, समीर मेलोदे, डॉ. मेघा घाटे, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी, राज्य युवा पुरस्कारार्थी प्रतिम सुतार, तहसील कार्यालयाचे अधिकारी, युवक–युवा वर्ग उपस्थित होते.

या महोत्सवात लोकगीत, लोकनृत्य, एकांकीका, पथनाट्य, कथालेखन, वक्तृत्व, पाककला, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, फोटोग्राफी यांसारख्या अनेक स्पर्धा झाल्या. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धांमध्ये युवक–युवतींचा भरभरून प्रतिसाद लाभला. युवक–युवतींना जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

जे स्पर्धक प्रथम क्रमांकाने विजयी झाले आहेत त्यांची निवड विभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धांकरिता करण्यात आली आहे. युवा महोत्सव यशस्वीरित्या होण्याकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, सिद्धार्थ खंडागळे, प्रफुल पाटील, सुरेंद्र कांबळे, अंकित मिंडे यांनीदेखील परिश्रम घेतले.

# कर्जतची शॉर्टफिल्म 'वळण'ने रचला इतिहास

## पुरस्कारांचे गाठले शतक

**कर्जत : प्रतिनिधी**

दहिवली भागात राहणारे दिग्दर्शक, लेखक, अभिनेते प्रदीप गोगटे यांनी 'वळण' ही शॉर्टफिल्म तयार केली. ही शॉर्टफिल्म इतकी गाजली की, तिला तब्बल १०० पुरस्कार मिळाले आहेत. हा कर्जतसाठी इतिहास रचला आहे.



शहरातील सिमेंट काँक्रीटच्या जंगलात राहणाऱ्या लहान मुलांना गावाकडील राहणीमान, संस्कृती याचे साध्या आणि सोप्या पद्धतीने सुंदर दर्शन घडवणारी कलाकृती म्हणजे वळण. अतिशय परिश्रम घेऊन या शॉर्टफिल्मची निर्मिती करण्यात आली आहे आणि हे सर्व श्रेय बालकलाकार, इतर कलाकार आणि एडिटर, सिनेमॅटोग्राफर आणि संपूर्ण प्रोडक्शन टीमचे आहे.

या लघुपटाच्या माध्यमातून कर्जत शहरासह गावातील मुलामुलींनाही संधी देता आली. या लघुपटात ऋत्वी ओसवाल, आर्वी ओसवाल, राज साळवी, स्पंदन पडते, साईराज खंडागळे, राजवी डोंबे आणि स्फुर्ती पडते या बालकलाकारांसह पूजा बंदरकर, विशाल रोकडे, आरती मॅडम, दिगंबर म्हसकर, शर्वरी जाधव आणि हेमंत वाघुले यांच्या भूमिका आहेत.

या लघुपटाचे एडिटींग प्रथमेश जाधव यांनी अतिशय छान पद्धतीने केले आहे, तसेच सिनेमॅटोग्राफर म्हणून हृषिकेश दांडेकर यांनी सुंदर चित्रीकरण केलेले आहे. कथा, पटकथा आणि दिग्दर्शन प्रदिप गोगटे यांचे आहे.

दिलीप गोगटे, मितेश कोळी, मोहित जाधव, शुभम कलघटगी, नचिकेत लाड, बाबू सकपाळ आणि तुकाराम जाधव यांनीही प्रॉडक्शन टीम म्हणून चांगले काम सांभाळले, तसेच मेकअप अभय शिंदे, फोटो डिझाईन माधुरी गोगटे, संगीत स्टुडिओ साउंड गॅरेजचे संजय पाठक यांनी केले आहे. जितेंद्र ओसवाल, महेश वैद्य, मुकेश सुर्वे, सुवर्णा जोशी, सतीश श्रीखंडे, दीपक बडगुजर, मनोज ओसवाल यांनी या लघुपटासाठी मदतीचा हात दिला.

# कर्जतमध्ये शिवसेनेतील महिलांची आढावा बैठक

**कर्जत : प्रतिनिधी**

येथे आमदार संपर्क कार्यालयात महिलांची आढावा बैठक झाली. या बैठकीत शिवसेना उपनेत्या रायगड जिल्हासंपर्क प्रमुख शिला देशमुख, मावळ लोकसभा संपर्कप्रमुख नम्रता भोसले यांच्या हस्ते महिलांना नियुक्तपत्र देण्यात आले.



या वेळी आमदार महेंद्र थोरवे, जिल्हासंपर्क प्रमुख संतोष भोईर, तालुका प्रमुख संभाजी जगताप, रायगड सल्लागार सुरेखा शितोळे, तालुका संघटक रेश्मा म्हात्रे, शहर संघटक भारती शिंदे, तालुका संपर्कप्रमुख आशा पालकर, शहर संपर्कप्रमुख सायली शहासने, ज्योती कुळकर्णी, माजी सभापती आरती भगत आदी उपस्थित होत्या. या वेळी उपनेत्या जिल्हा संपर्कप्रमुख शीला देशमुख यांनी, पक्ष जेव्हा एखाद पद देते तेव्हा त्या पदाची जबाबदारी लक्षात घेऊन त्या पदाचा वापर सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पक्ष वाढविण्यासाठी केला पाहिजे, असे सांगितले. मावळ लोकसभा संपर्क प्रमुख नम्रता भोसले यांनी, सर्व क्षेत्रात महिला पुढे आहेत. महिला उत्तम प्रकारे पदाची जबाबदारी पार पाडतील, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी नीलम चोरगे, सुरेखा खेडेकर,नगरसेविका सुप्रिया साळुंखे, वैजयंती ठाकूर, सुमन भोईर, कविता जाधव, प्रिया रसाळ, प्रिया कोळंबे, निता शिंदे, नंदिनी देशमुख, सोनू येरुनकर, मनीषा ठोंबरे, अरुणा मोरे, सुरेखा पिंगळे, नयना भोईर, आरती तिखंडे, हर्षदा पडवळ, संगीता वाघमारे, रोहिणी शिंदे, प्रयांका भालेराव, विद्या गायकवाड, सुगंधा गायकवाड, दक्षता देशमुख आदी उपस्थित होते.

### विविध नियुक्त्या

गौरकामथ शाखाप्रमुख नयना भोईर, उपशाखाप्रमुख हर्षदा जाधव, वेणगाव शाखाप्रमुख अर्चना चौधरी, उपशाखाप्रमुख नीलम पालकर, संत रोहीदास नगर शाखाप्रमुख अनिषा गायकवाड, उपशाखाप्रमुख विद्या गायकवाड, ग्रामपंचायत प्रमुख संत रोहीदास नगर सुगंधा गायकवाड, शाखाप्रमुख बोद्धवाडा प्रियांका भालेराव, उपशाखाप्रमुख रोहिणी शिंदे, शाखाप्रमुख आदिवासीवाडी संगीता गणेश वाघमारे, उपशाखाप्रमुख आदिवासीवाडी संगीता वसंत वाघमारे, जोत्स्ना बैलमारे लाडिवली शाखाप्रमुख, आशा पवार लाडिवली उपशाखा प्रमुख, आरती तिखंडे तिवरे शाखाप्रमुख, हर्षदा पडवळ तिवरे उपशाखा यांची नियुक्ती करण्यात आले आहे.

# नोकरीच्या आमिषाने १५ जणांना गंडा

**पनवेल : वार्ताहर**

सुरक्षारक्षक मंडळामध्ये कार्यरत असलेल्या एका सुरक्षारक्षकाने सुरक्षा रक्षक मंडळामध्ये कामाला लावून देण्याचे आमिष दाखवून १५ व्यक्तींकडून तब्बल पाच लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले.

ज्ञानेश्वर नथू राठोड असे या सुरक्षा रक्षकाचे नाव असून, सानपाडा पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. ज्ञानेश्वर राठोड याच्या विरोधात १५ व्यक्तींनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असली तरी, त्याने यापेक्षा अधिक लोकांची फसवणूक केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक ज्ञानेश्वर राठोड हा सुरक्षा रक्षक मंडळात कामाला असून, त्याने २०२२ मध्ये सुरक्षारक्षक मंडळात नोकरीला लावून देण्याच्या बहाण्याने अनेकांकडून पैसे उकळले होते. यापैकीच एक असलेल्या डोंबिवली येथे राहणाऱ्या संगीता जाधव असून, एका महिलेच्या माध्यमातून त्यांची राठोड याच्यासोबत ओळख झाली होती. त्या वेळी राठोड याने संगीता जाधव यांना सुरक्षा रक्षक मंडळात नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून मे २०२२ मध्ये ३२,५०० रुपये घेतले होते. त्यानंतर राठोड याने सुरक्षा रक्षक मंडळामध्ये भरतीसाठी आणखी काही जागा शिल्लक असल्याचे संगीता जाधव यांना सांगितले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या ओळखीतल्या इतर १४ जणांना सुरक्षा रक्षक मंडळातील नोकरीबाबत माहिती दिल्यानंतर त्यांनीदेखील सुरक्षा रक्षक मंडळात नोकरी करण्याची तयारी दर्शवली होती. त्यानंतर राठोड याने त्यांच्याकडूनदेखील नोकरी मिळवून देण्याच्या बहाण्याने प्रत्येकी ४० ते ५० हजारांची रक्कम घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी तसेच पोलीस व्हेरीफिकेशन करून घेतले होते.

काही महिन्यांनंतर या सर्वांनी राठोड याच्याकडे नोकरीसंदर्भात विचारपूस केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे राठोड यांच्यावर संशय आल्याने या १५ जणांनी आपले पैसे परत मागण्यास सुरुवात केली, मात्र पैसे देण्यासदेखील त्याने टाळाटाळ केली. त्यानंतर राठोड याने आपला फोन बंद करून ठेवल्याने फसवणूक झालेल्या या १५ जणांनी त्याचा शोध घेत सानपाडा येथील सुरक्षा रक्षक मंडळाचे कार्यालय गाठले असता, सध्या कुठलीही भरती नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर या १५ जणांनी सानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन ज्ञानेश्वर राठोड याच्या विरोधात तक्रार दाखल केली.

### फसवणुकीचा गुन्हा दाखल

*आरोपी ज्ञानेश्वर राठोड याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याच्या हातून फसवणूक झालेल्या १५ जणांनी सानपाडा रेल्वे स्टेशन येथील सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयात जाऊन त्याच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याची माहिती दिली. तसेच त्याच्यावर कारवाई करण्याची विनंती केली. त्यानुसार सुरक्षा रक्षक मंडळानेदेखील राठोड याच्यावर कारवाईला सुरुवात केली आहे.*

# सारसोळे डेपोच्या प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग; सफाईची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपाच्या वतीने विभागातील अनेक ठिकाणच्या कचराकुंड्या हटविण्यात आलेल्या आहेत. पालिकेकडून तशा प्रकारची सुचना आलेल्या आहेत, मात्र नागरिकांकडून याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. सारसोळे बस डेपोच्या प्रवेशद्वारासमोर रस्त्यावर कुठेही कचरा टाकला जात आहे. या कचऱ्यांच्या ढिगामुळे सारसोळे बस डेपोसह परिसराला बकालपणा आला आहे.

पालिकेने कचराकुंडी मुक्त शहर करण्याचा पूर्णपणे प्रयत्न करत असताना दुसरीकडे सुशिक्षित नागरिक रस्त्यावर, फुटपाथवर, बस डेपोच्या प्रवेशद्वार, उद्याच्या गेट समोर जिथे जागा मोकळी दिसेल तिथे कचरा फेकत असतात. हा कचरा ओला सुका कचरा एकत्र असल्यामुळे याचा उग्र वास येत असून मच्छर तयार होतात त्यामुळे बस डेपो मध्ये आलेल्या प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तासंतास बसची वाट पाहत बसलेल्या प्रवाशांना नाक मुठीत धरून बसावे लागत आहे.



सारसोळे डेपोच्या प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग पाहता स्वच्छ सर्वेक्षणाला तिलांजली दिल्याचा प्रकार पाहायला मिळत आहे. नेरुळ परिसरामध्ये कचऱ्याची समस्या खूप गंभीर बनत चालली आहे. अशातच महापालिकेने स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत प्रत्येक नोट मधून कचराकुंड्या हटवल्या आहेत. याबद्दल मनपाने सूचना दिल्या आहेत, मात्र नागरिकांकडून रस्त्यावरच कचरा टाकण्याचे प्रकार सर्रास पणे घडत आहे. नेरूळ मधील सारसोळे बस डेपोचे प्रवेशद्वार, तसेच रस्त्यावर अन्य ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. शहरातील रस्ते आणि उद्यानांच्या बाहेर आणि आता सारसोळे बस डेपोच्या प्रवेशद्वारावर व इतर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे नेरूळ परिसरात डासांचे प्रमाण वाढले असून बससाठी येणाऱ्या प्रवासी नागरिक मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

सारसोळे बस डेपोच्या प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग हे स्वच्छ सर्वेक्षणामध्ये अडथळा निर्माण करण्याचे काम होत आहे. नवी मुंबई शहराला रंगरंगोटीचे काम केले असून दुसरीकडे सार्वजनिक ठिकाणी मोठमोठे कचऱ्याचे ढीग साचलेले पाहायला मिळतात. त्यामुळे या कचऱ्याच्या ढिगांमुळे सारसोळे बस डेपोसह नवी मुंबई शहरालादेखील बकालपणा आला असल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच बस डेपोमध्ये येणाऱ्या महिला नागरिक लहानमुलांसह नाराजगी व्यक्त केली जात असून पालिकेच्या वतीने लवकरात लवकर नेरूळमधील सारसोळे डेपोच्या प्रवेशद्वारासमोरील कचऱ्याचे ढीग उचलवून इथे कचरा कुंड्या हटविल्याच्या पाट्या लावाव्यात, अशी मागणी सारसोळे डेपोमध्ये येणाऱ्या प्रवाशांनी केली आहे

> **सारसोळ डेपो प्रवेशद्वार तसेच अन्य सार्वजनिक ठिकाणी टाकत असलेल्या कचर्याची पाहणी करण्याचे आदेश संबंधित अधिकारी यांना त्वरित देतो.**
> **–बाबासाहेब राजळे, उपायुक्त, घनकचरा विभाग, नवी मुंबई मनपा**

# दोन महिलांना अमली पदार्थ तस्करीच्या आरोपाखाली अटक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील एपीएमसी पोलीस ठाण्यात दोन महिलांना अमली पदार्थ तस्करीच्या आरोपाखाली अटक करण्यात आले, असून त्यांच्याकडून तीन लाख ६६ हजार ९६० रुपये किंमतीचे प्रतिबंधित औषध मेफेड्रोन जप्त केले आहे.

गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत एपीएमसी पोलिसांच्या काही अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळी एपीएमसी परिसरातून अमली पदार्थ तस्करीच्या आरोपाखाली अटक करण्यात आले आहे, आरोपी मंजू फारूक (वय ३०), रशिदा शेख (वय ३७) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

नवी मुंबईत गांजा गुटकाप्रकरणी अनेकदा महिला आरोपींना अटक केले आहे, मात्र पहिल्यांदाच एमडीसारख्या अमली पदार्थ प्रकरणी भारतीय नागरिक असलेल्या महिलां आढळून आल्या आहेत. या पूर्वी अमली पदार्थ प्रकरणी अटक महिला आफ्रिका खंडातील देशातील महिलांचा सहभाग आढळून आला होता.



**उरण : जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट फार्मासिस्ट पुरस्कार उरणमधील ओमसाई मेडिकल स्टोअरचे मालक फार्मासिस्ट मनोज ठाकूर यांना मिळाला आहे. याबद्दल त्यांचे आमदार महेश बालदी, भाजप शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगरसेवक राजू ठाकूर, जसिम गॅस, अन्नी घरत, देवेंद्र घरत, अभय घरत आदींनी अभिनंदन केले.**

# 'रोटरी'तर्फे वनराई बंधारे प्रकल्पास सुरुवात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा व रायगड जिल्हा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वनराई बंधारे प्रकल्पास सुरुवात करण्यात आली.

शेतीच्या कामांसाठी वापरता येणारी साठवण क्षमता वाढवण्याबरोबरच, पाण्याचा कमी झालेला वेगही पाण्याला जमिनीत शिरण्यास किंवा झिरपण्यास पुरेसा वेळ देतो, त्यामुळे त्या विशिष्ट भागात भूजल पातळी वाढते. हे मुबलक पाणी मे महिन्यापर्यंत वनराई बंधाऱ्यांमध्ये साचते, ज्याचा उपयोग आदिवासी शेतकरी रब्बी हंगामात भाजीपाला आणि कडधान्ये लागवड करण्यासाठी करतात. तसेच वन्य व पाळीव प्राणीदेखील हे पाणी पिण्यासाठी वापरतात. पनवेल तालुका मंडळ कृषी अधिकारी भगवान हेगडे तसेच खालापूर तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी जगदीश देशमुख यांनी वनराई बंधारेसाठी एकूण १६८ ठिकाणे चिन्हांकित केले आहेत. कृषी अधिकारी तसेच कृषी सहाय्यक प्रसाद, रमेश व इतर सहाय्यकाच्या मदतीने व गावकऱ्यांचे श्रमदानाने हे प्रकल्प राबवल्या जात आहे हा प्रकल्प १ नोव्हेंबरपासून सुरू केला असून ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होईल. जिल्हा कृषी विभाग अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेळे ह्यांनी या वर्षभरात रायगड जिल्ह्यात एकूण १००० बंधारे बांधण्यास योजिले आहेत आणि त्यासाठी रोटरीची मदत व सहकार्य मागितले आहे.

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष रेश्मा कुरूप यांनी वनराई बंधारासारख्या महत्वपूर्ण प्रकल्पात रोटरी क्लब व त्यांचे सर्व सदस्यांना सामील करून घेतल्याबद्दल जिल्हा कृषी विभागाचे मनपूर्वक आभार मानले आणि कृषी विभागाला शक्य ते मदत करण्याची हमी दिली. तसेच रोटेरिअन गणेश मेणसे, सुनील भोसले, डॉ. मिलिंद भगत, देवेंद्र महिंद्रकर, विजय पाटील, गणेश वर्तक, ऋतुजा भोसले, सुशांत उचित, अमित शाह, राजू बोराडे, संदीप साबळे व सुनील कुरूप यांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.



(छाया : राकेश खराडे)

# गुळसुंदे येथे जागतिक दिव्यांग दिनी निर्वाह भत्तावाटप



**रसायनी : वार्ताहर**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे हद्दीतील दिव्यांग लाभार्थींना निर्वाह भत्ता अंतर्गत पाच हजार रुपयांचा धनादेश रविवारी (दि.३) देण्यात आला.

गुळसुंदे ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास नवनिर्वाचित सरपंच मिनाक्षी भास्कर जगताप (पाटील), उपसरपंच अरुणा अभिजित पाटील, सदस्य सतिश सदाशिव साठे, महेश लक्ष्मण पाटील, रमेश शांताराम मालुसरे, दिपाली प्रवीण जगताप, आशा गजानन वीर, अपर्णा संतोष चौलकर, ग्रामविकास अधिकारी रामदास बाबाजी दासगावकर आदी उपस्थित होते.

या वेळी गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील गुळसुंदे, लाडिवली व आकुळवाडी येथील दिव्यांग लाभार्थींना पाच हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप निर्वाह भत्ता स्वरूपात करण्यात आले. हा लाभ दिव्यांगांना ३१ मार्च २०२४पर्यंत दिला जाणार आहे.

# निराधार महिलांना शिलाई मशीनचे वाटप



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम, महाराष्ट्र यांचा पादुका दर्शन सोहळा रांजणदेवी माता मैदान, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे झाला.

श्रींच्या पादुकांच्या भव्यदिव्य मिरवणूकीमध्ये भजनपथक, लेझीमपथक, तसेच विविध पथके सहभागी झाली होती. तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते. पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रम दुर्बल घटक पुनर्वसन उपक्रमांतर्गत गरीब व निराधार महिलांना १८ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमावेळी नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार, कल्पना संजीव नाईक, माजी नगरसेविका मोनिका पाटील, सायली शिंदे, राष्ट्रभुषण शाहीर रुपचंद चव्हाण, समाजसेवक संदिप म्हात्रे, नारायण शिंदे, तुषार करवाडकर, प्रल्हाद पाटील, ज.न.म.संस्थान संजीवन ट्रस्टचे प्रमुख उदय रानभरे, मुबंई पिठ व्यवस्थापक संदिप म्हात्रे, मुंबई जिल्हा व्यवस्थापक मनोज पाडावे आदी मान्यवर तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवी मुंबईत स्वच्छ शौचालय अभियान

# महिला बचत गटांमार्फत होणार तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेमध्ये देशातील तृतीय क्रमांकाच्या स्वच्छ शहराचा बहुमान लाभलेली नवी मुंबई महापालिका केंद्र व राज्य शासनाच्या सर्वच अभियानांमध्ये पुढाकार घेऊन काम करताना दिसते. अशाच प्रकारे केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या 'स्वच्छ शौचालय अभियान' कार्यक्रमातही महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिका उत्साहाने सहभागी झालेली आहे.

१९ नोव्हेंबर या जागतिक शौचालय दिवसापासून अभियानाला प्रारंभ झाला असून २५ डिसेंबर या सुशासन दिनापर्यंत अभियान कालावधी असणार आहे. या पाच आठवड्यांच्या कालावधीत सर्व शौचालयांमध्ये स्वच्छता व देखभाल विशेष मोहीम राबवली जाणार असून शौचालयांमध्ये FACES अर्थात Functional, Accessibility, Clean, Eco-friendly आणि Safe अशाप्रकारे 'कार्यान्वित, प्रवेशयोग्य, स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित' अशा बाबींनुसार शौचालय तपासणी करण्यात येणार आहे.



या अभियानांतर्गत महिला बचत गटांद्वारे शौचालयांची तपासणी करण्यात येणार असून त्याची वर्गवारी केली जाणार आहे. या माध्यमातून महिला बचत गटांचे सक्षमीकरणही केले जाणार आहे. यासाठी महिला बचत गटांची नियुक्ती करण्यात येत असून त्यांना रितसर प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिला बचत गटांचे हे तपासणी समूह शौचालयांना भेटी देऊन त्यांची प्रत्यक्ष पाहणी करत दिलेल्या निकषानुसार त्यांचे मूल्यांकन करून शौचालयांना श्रेणी देतील.

याप्रमाणेच 'स्वच्छ शौचालय चॅलेंज' जाहीर करण्यात आले असून ५ डिसेंबर ते १५ डिसेंबर हा या अभियानाचा कालावधी आहे. या अंतर्गत स्वच्छ शौचालयांना 'स्वच्छ भारत सार्वजनिक शौचालय' असा गुणवत्तेचा दर्जात्मक शिक्का प्राप्त होणार आहे.

अभियानाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांनी विविध शौचालयांना भेटी देत तेथील केअरटेकरना अधिक गुणात्मक काम करण्याच्या सूचना दिल्या व शौचालयातील स्वच्छतेची आणि सुविधांची पाहणी केली.

### गुणात्मक दर्जा कायम ठेवण्याकडे भर

नवी मुंबई शहरात राहणाऱ्या नागरिकांना तसेच नवी मुंबईतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व नवी मुंबईला विविध कारणांमुळे भेटी देणाऱ्या पर्यटकांना उत्तम दर्जाची शौचालये उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महापालिका कटिबद्ध असून महापालिकेची सर्व शौचालय गुगल मॅप वर सहजपणे उपलब्ध आहेत व नागरिकांच्या वापरासाठी त्यांचा गुणात्मक दर्जा कायम राहील याच्याकडेही लक्ष दिले जात आहे.

# मेगा प्रॉपर्टी एक्झिबिशनमध्ये ग्रंथ प्रदर्शनाला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

सीआरइडीएआय–बीएएनएमच्या वतीने १ डिसेंबरपासून सुरु झालेल्या वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये प्रदर्शन (२२वे मेगा प्रॉपर्टी एक्झिबिशन)मध्ये सनातन संस्थेच्या वतीने लावण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शनाला विविध क्षेत्रातील मान्यवर आणि जिज्ञासूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या ग्रंथप्रदर्शनाला भेट देणारे बांधकाम आणि विविध क्षेत्रातील व्यवसायिक यांच्यासह विविध मान्यवर आणि जिज्ञासू यांनी सनातन संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेले अध्यात्म, साधना, देवतांची उपासना, धर्माचरण, राष्ट्ररक्षण, धर्मजागृती, आपत्काळविषयीची सिद्धता आयुर्वेद, आरोग्य आदी विषयांवरील ग्रंथमालिकेतील ग्रंथ आणि सात्विक उत्पादने घेतली. अनेकांनी यावेळी साधना, वास्तूशुद्धी आदी विषयांवर शंकानिरसन करून घेतले, तसेच दैनंदिन जीवनात धर्माचरण आणि साधनेसाठी करावयाचे प्रयत्न आणि कृती सुद्धा काही जिज्ञासूंनी समजून घेतल्या.

सनातन संस्थेने प्रकाशित केलेल्या ग्रंथांच्या मागणीसाठी ९३२०००३५६० या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



निवडक

## आदिवासी बांधवांना अन्नधान्य वाटप



**मुरूड** : माजी केंद्रीय मंत्री तथा माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांच्या स्मृतीदिनी वसंतराव नाईक महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला बॅ. ए. आर. अंतुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी शहराच्या नजीक तेलवडे येथील तक्का आदिवासीवाडी व तेलवडे येथील आदिवासीवाडी येथील बांधवांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. वसंतराव नाईक महाविद्यालय विकास समिती सदस्य वासंती उमरोटकर, प्राचार्य डॉ. एम. ए. नगरबावडी, उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. एस. भैरगुंडे, प्रा. जी. डी. मुनेश्वर, प्रा. एस. एल. म्हात्रे, प्रा. अनुपसिंग, प्रा. बी. बी. बागवे, प्रा. चिंतन पोतदार, तेलवडे ग्रामपंचायत सरपंच कल्पना पवार, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी राजे, अंगणवाडीसेविका, आशावर्कर, स्वयंसेवक उपस्थित होते.

## पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर



**पाली** : मराठी पत्रकार परिषदेच्या ८५व्या वर्धापन दिनानिमित्त रायगड प्रेस क्लबच्या वतीने रविवारी (दि. ३) पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात सुधागड तालुक्यातील पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांच्या सहकार्याने शिबिर झाले. या वेळी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष विनोद भोईर, कार्याध्यक्ष रवींद्रनाथ ओव्हाळ, उपाध्यक्ष संतोष उतेकर व ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र मेहता यांनी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी, वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकुमार मुळे, पाली प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका खरात, आरोग्य केंद्र खवली वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता नाईक, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अजय गायकवाड व समीर शेख, तालुका क्षयरोग पर्यवेक्षक विशाल महाजन, औषध निर्माण अधिकारी सुदेश पाटील, प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रतिज्ञा शेरमकर, परिचारिका विनया सोडिये, समाधान भगत, श्रद्धा गोरे व शाम खोडागळे यांनी परिश्रम घेतले.



**रोहा : वारकऱ्यांची दमखाडी ते आळंदी पायी दिंडी निघाली. या वेळी माजी गटनेते महेंद्र गुजर, मयूर दिवेकर, महेश कोलटकर, नरेश पडवळ, काशिनाथ धाटावकर, शेळके महाराज व इतर सर्व वारकरी.**

# फणसाड धरण रस्त्याच्या कामाला मंजुरी

## आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने ७५ लाखांचा निधी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मांडला-बेलवाडी-फणसाड या १० किमी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणास आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने ७५ लाख रूपये निधी मंजूर करण्यात आला आहे. तसे पत्र आमदार महेंद्र दळवी यांनी बेलवाडी ग्रामस्थांकडे सुपूर्द केले.



मुरूड तालुक्यातील फणसाड धरण हे पावसाळी पर्यटनासाठी खास आकर्षण आहे. येथे मोठ्या संख्येने निसर्गप्रेमी मंडळी भेटीस येतात. बोर्ली येथून मांडला, बेलवाडीमार्गे फणसाड धरणाकडे जाण्याचा मार्ग आहे. येथून जाण्यासाठी सुयोग्य रस्ता नसल्याने पर्यटक नाराजी व्यक्त करीत होते. या रस्त्यासाठी बेलवाडी ग्रामस्थ अनेक वर्षे मागणी करीत होते. बेलवाडी ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून ७५ लाख रूपये अंदाजित खर्चाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये रस्त्यासाठी मातीकाम, खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच एक नवीन पाईप, मोरीचे बांधकाम, कच्चे गटर्स, मुरूम, साईडपट्टी या कामांचा समावेश आहे.

अलिबाग येथे आमदार निवासस्थानी बेलवाडी ग्रामस्थांना आमदार महेंद्र दळवी यांनी पत्र प्रदान केले. या वेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, यांचेसह बेलवाडी ग्रामस्थ विश्वास गोणबरे, महादेव धडशी, मनोहर गवाणकर, गणेश गावणकर, जयंता वणे, नथुराम गावणकर, वसंत किंजले, मंगेश डिके, नरेंद्र गावणकर, सचिन वणे, नरेश गावणकर, तुषार वणे, जितेंद्र गोताई, अमोल देवाले, गोविंद घडशी, धर्मा गोताड, किसन छापेकर,संजय गावणकर, तेजस मोगरे, दत्ताराम गावणकर, नागू वणे, नितीन घाणेकर, भागोजी तेरेकर, किसन गोंताडे, परशुराम कानवकर, सुमित कासार, अजितेश कासार, अमर कासार, राज तटकरे, गणेश मोहिते, मांजरेकर भाऊजी आदी उपस्थित होते.

## माणगावात भाजपच्या विजयाचा आनंदोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत राजस्थान, मध्यप्रदेश व छत्तीसगड या तीन राज्यात भारतीय जनता पक्षाने मोठे यश संपादन केले. या विजयाचा फटाक्यांची आतिषबाजी करून तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.



लोकसभेची मिनी फायनल म्हणून या निवडणुकांकडे पाहिले जात होते. रविवारी (दि. ३) सकाळी या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर भाजपने राजस्थान, मध्यप्रदेश व छत्तीसगड या तीन राज्यात मोठे यश संपादन केले. या विजयानंतर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी एकत्र येत मुंबई-गोवा महामार्गावर फटाक्यांची आतिषबाजी करीत या विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.

जिल्हा भाजप नेते चिन्मय मोने म्हणाले की, भाजपचा सब का साथ, सब का विकास हा नारा आहे. केंद्र सरकारतर्फे विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. भाजपने जनतेच्या मनात एक विश्वासार्हता निर्माण करून विकासकामांची झलक दाखवल्यानेच पक्षाने राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड या तीन राज्यांतून दैदिप्यमान असा विजय संपादन केला आहे.

या वेळी तालुकाध्यक्ष उमेश साटम, ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेंद्र साळी, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, शहराध्यक्ष नितीन दसवते, तालुका सरचिटणीस गोविंद कासार, जिल्हा भाजप नेत्या प्राजक्ता शुक्ला, महिला मोर्चा शहराध्यक्ष भारती शेट, विधिता मेथा, उपतालुकाध्यक्ष योगेश पालकर, अमोल पवार, संजय जाधव, राजेंद्र गाडे, प्रदीप दळवी, महावीर जैन आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिव्यांग सप्ताहानिमित्त रायगडात तपासणी शिबिर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जागतिक दिव्यांग दिन ३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून ३ ते १० डिसेंबरमध्ये जिल्ह्यात दिव्यांग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीमध्ये विविध ठिकाणी दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्याचा लाभ दिव्यांग बांधवांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी केले आहे.

दिव्यांग बंधू-भगिनींच्या उत्कर्षासाठी ग्रामपंचायत स्तरापासून अनेक योजना शासनाच्या माध्यमातून राबविल्या जातात, तसेच विद्यार्थ्यांकरिता परीक्षेत वेळेची सवलत, प्रवासासाठी सवलत अशा अनेक सुविधांचा लाभ बांधवांना घेता येतो, परंतु त्याकरिता दिव्यांग वैश्विक ओळखपत्र (UDID) त्यांच्याकडे असणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाने ६ डिसेंबर रोजी जिल्हा रुग्णालय, अलिबाग, ७ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय माणगाव, ९ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय महाड येथे तर ११ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय म्हसळा व १५ डिसेंबर रोजी ग्रामीण रुग्णालय, श्रीवर्धन येथे अस्थिव्यंग, नेत्र, मानसिक आजाराविषयी विशेष दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त अस्थिव्यंग, नेत्र, कर्ण-मुकबधिर, भिषक व मानसिक आजाराविषयी दर बुधवारी जिल्हा रुग्णालय अलिबाग तसेच दर शुक्रवारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल आणि प्रत्येक महिन्याच्या पहिल्या गुरुवारी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे नियमित दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते.

तपासणी शिबिराकरिता उपस्थित राहताना लाभार्थ्यांनी www.swavlambancard.gov.in या वेबसाईटवर आपली नावनोंदणी करून त्या अर्जाची प्रत, आधार कार्ड, रेशन कार्ड, दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्र व आधी केलेल्या उपचारांची सर्व कागदपत्रे सोबत आणावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## फोटो सर्कल सोसायटीतर्फे छायाचित्रकार सुधीर नाझरे, सौरभ नाझरे यांचा गौरव




**मुरूड : प्रतिनिधी**

फोटो सर्कल सोसायटीतर्फे २४व्या एफसीएस ग्रँड राष्ट्रीय आणि महाराष्ट्र राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शन आविष्कारचे पारितोषिक वितरण ठाणे महापालिकेचे माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत ऐतिहासिक गडकिल्ले या विषयात सुधीर नाझरे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक १० हजार रोख व सन्मानचिन्ह तर लग्नसमारंभातील फोटो या विषयावर सौरभ नाझरे याला प्रथम क्रमांकाचे १० हजार रोख व मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

ज्येष्ठ छायाचित्रकार शिरीष कराळे, फोटो सर्कल सोसायटीच्या विधी सल्लागार ॲड. माधवी नाईक, अध्यक्ष हृदयनाथ कोळी, प्रवीण देशपांडे, संदीप लेले, संजीव नाईक आदी या वेळी उपस्थित होते. या प्रदर्शनात ज्येष्ठ छयाचित्रकार समीर मोहिते, किरण तांबट, महेश आंब्रे, निखिल पांचाळ, राकेश रावळ, अंकुर तांबे, गणेश मेमाणे आदींचे फोटो लावण्यात आले.

## साजगाव यात्रेनिमित्त वाहतुकीत बदल

■ शिळफाटा ते साजगाव केवळ एकेरी वाहतूक

■ सायंकाळी अवजड वाहनांवर सरसकट बंदी

**खोपोली : प्रतिनिधी**

साजगाव यात्रेनिमित्त खोपोली-पेण राज्यमार्गावरील वाहतुकीत खोपोली पोलिसांनी बदल केले आहेत. यात्रेदरम्यान होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी हा बदल करण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक शितल राऊत व सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश काळसेकर यांनी सांगितले.


रविवारी (दि. ३) सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा बदल असणार आहे. खोपोली शिळफाटा ते इंदिरा गांधी चौक, साजगाव यात्रा व इसांबा फाटा अशी एकेरी वाहतूक असणार आहे. शिळफाटाकडे येणारी वाहतूक ही ईसांबा फाटा सावरोली ते खालापूरमार्गे खोपोलीकडे येणार आहे. औद्योगिकपट्ट्यातील ढेकू, साजगाव, होनाड आदी भागातून येणारी वाहतूक टाकई फाटा येथून ईसांबा फाटा सावरोली खालापूरमार्गे खोपोली येथे येणार आहे. या एकेरी वाहतुकीत अवजड वाहतूक पूर्णपणे बंद असणार आहे, तसेच खोपोलीहून येणाऱ्या वाहनांनी ढेकूकडे जाताना ताकई फाटा येथून वळण न घेता सारसनमार्गे वाहने न्यावी, असे बदल करण्यात आले आहे. हे बदल दुचाकीस्वारांना लागू असणार नाहीत.

गेले दोन दिवस यात्रेत येणाऱ्या वाहनांच्या संख्येत झालेली वाढ, त्याचप्रमाणे पालीमार्गे व इमॅजिका येथून येणारी वाहतूक यामुळे या रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे साजगाव यात्रेदरम्यान एकेरी वाहतूक बदल करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# प्रस्तरारोहकांनी केला अवघड मच्छिंद्रगड सुळका सर

**पाली : प्रतिनिधी**

प्रसिद्ध प्रस्तरारोहक व सुधागड तालुक्यातील रहिवासी मॅकमोहन हुले व मॅकविला द जंगल यार्डच्या सदस्यांनी अवगड असा मच्छिंद्रगड सुळका नुकताच यशस्वीपणे सर केला आहे. सुळक्याची प्रस्तर मार्ग उंची २०० फुट, तर संपूर्ण प्रस्तरारोहण चढाई १०० मीटर इतकी होती.





ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात असलेला मच्छिंद्रगड सुळका चढाई करणे म्हणजे कठीण आहे. मच्छिंद्रगडावर स्वारी करण्यासाठी मॅकविला द जंगल यार्डचे प्रस्तरारोहक २६ नोव्हेंबरला निघाले. संस्थेचे चार सदस्य म्हणजेच मॅकमोहन हुले, सागर मेस्त्री, प्रणय पाटील, निलांचल गौडा निघाले. रात्री गोरखगड मध्यस्थानी असलेल्या शिवमंदिराशेजारी तंबू लावून सकाळी मच्छिंद्रच्या चढाईला सुरुवात करायची होती. मध्यरात्री तुफान वारे सुटले, झोप काही पूर्ण झाली नाही. रात्रभर तंबू पकडून सर्व बसले होते. पाऊस थांबताच 'मच्छिंद्र'कडे प्रस्थान केले. गोरखगडाच्या वाटेत असणाऱ्या शिवमंदिरापासून उजवीकडे वळणाऱ्या वाटेने मच्छिंद्रचा पायथा गाठला. रात्रीच्या पावसामुळे माती चांगलीच निसरडी झाली होती. तिथे असलेल्या एका झाडाला दोर बांधून प्रणय पाटील सज्ज झाला. निसरडी माती, हलणारे दगड, वारा सतत वाटेआड येत होते. वाटेत एक जुनी मेख दिसली. या आधी केलेल्या मोहिमेची ही खूण, पण तिची अवस्था फार वाईट होती. त्याच्याच पुढे एका चीरेत नवीन मेख रोवली आणि स्वतःला सुरक्षित करून पुढे चढाई सुरू केली. अवघ्या ३० मिनिटांमध्ये सर्वांनी पहिला टप्पा पार केला होता. पुढचा टप्पा पण तसा सोप्पा होता, पण जास्त धोका हा दगडापेक्षा मातीवरून चालण्यात असतो. दुसरा टप्पा सर झाला. आता मात्र पुढे कस लागणार होता कारण पुढचा टप्पा मोठा. त्यात चढाईचा मार्गदेखील नीट दिसत नव्हता. पुन्हा साधारण २० फूट उतरून खाली गेले आणि पुढची चढाई सुरू झाली, पण मार्ग गाठण्यासाठी ३० फूट डाव्या बाजूला निसरड्या मातीवरून सरकत गेले. आता पुढे ६० फुटांवर प्रस्तर दिसू लागला होता. हाच शेवटचा टप्पा होता. तब्बल ५० फूट कोणतेही सुरक्षासाधन न लावता या टप्प्याची चढाई सुरू होती. हा कठीण टप्पा पार केला आणि एका झाडाला स्लिंग बांधून सुरक्षा दोर ओवून घेतले. पुन्हा सगळे वर आल्यावर आता समोर होता १० फुटी कातळ, मोठी चिर, अंगावर येणारा थोडा भाग आणि खाली ३०० ते ४०० फुट खोल दरी. हा टप्पासुद्धा पार झाला. समोर गोरखगडावर असणाऱ्या गिर्यारोहकांनी एकच जल्लोष केला.

> **या हंगामाची सुरुवात मच्छिंद्रनाथाच्या आशीर्वादाने झाली आहे. या हंगामामधली ही पहिली मोहीम त्यामुळे माथ्यावर पोहोचण्याचा आनंद वेगळाच होता. सगळ्यात जास्त चुका परतीच्या वेळी होतात. यशाने हुरळून न जाता काळजी घेत आम्ही वर आधीच असणाऱ्या मेखेला दोर बांधून खाली उतरायला सुरुवात केली. अशाच पद्धतीने इतर दोन टप्पे पार करत आम्ही मच्छिंद्रच्या पायथ्याला पोहचलो.**
>
> **-मॅकमोहन हुले, प्रस्तरारोहक व संस्थापक**

### गिर्यारोहकांचे आकर्षण

गोरखगड आणि मच्छिंद्रगड या किल्ल्यांना गोरक्षनाथ आणि मच्छिंद्रनाथ या गुरु-शिष्यांची नावे लाभली आहेत. गडाचा उपयोग हा प्रामुख्याने टेहळणीसाठी होत असावा. अजस्त्र अशा सुळक्यामुळे हे ठिकाण गिर्यारोहकांसाठी नेहमीच आकर्षण राहिले आहे. आव्हानात्मक ट्रेक आणि रॉक क्लाईंबिंग आदी कारणांमुळे इतिहासाची आवड, साहस व जिद्द यांची भूक भागवण्यासाठी हे एक अप्रतिम ठिकाण आहे.

## कर्जतमधील ग्रामदैवतेच्या गाभाऱ्यात दूषित पाणी

### उपाययोजनेसाठी नगर परिषदेला निवेदन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे जागृत ग्रामदैवत श्री धापाया महाराज मंदिरातील गाभाऱ्यात दूषित पाणी येत आहे. याबाबत उपाय करावा, अशी मागणी करीत ग्रामस्थांनी नगर परिषदेस निवेदन दिले आहे.

सामजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे, भाई आणेकर, माजी नगरसेवक मुकेश पाटील, महेंद्र चंदन, मनोज वरसोलिकर, मोहन भोईर यांनी मुख्याधिकारी वैभव गारवे यांची भेट घेऊन निवेदन दिले. कर्जतचे जागृत ग्रामदैवत श्री धापाया महाराज मंदिरातील गाभारा बाराही महिने पाण्याने भरलेला असतो. नगर परिषदेने काही वर्षांपूर्वी शहरातील मुख्य गटारातील बांधकाम केले. मुख्य गटारातील पाण्याला पुढे जाण्यास जो उतार पाहिजे होता तो न दिल्यामुळे पाणी तुंबून राहते. त्यामुळे गटारातील घाण पाणी झिरपून बाजूलाच असणाऱ्या मंदिरातील गाभाऱ्यात जमा होते व दुर्गंधी येते. याबाबत श्री धापाया देवस्थान समितीनेही निवेदन दिलेले आहे.

किशोर व किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

# धाराशिव, सोलापूर विजेते





**पालघर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने ३८व्या किशोर व किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा पालघर चिंचणी येथील के. डी. हायस्कूलच्या मैदानावर झाली. किशोर गटात धाराशिवने ठाण्यावर, तर किशोरी गटात सोलापूरने चुरशीच्या सामन्यात धाराशिववर मात करीत विजेतपद पटकावले.

किशोरांमध्ये धाराशिवचे हे सलग चौथे आाणि एकूण पाचवे अजिंक्यपद आहे. किशोरींमध्ये सोलापूरचे हे एकूण दुसरे अजिंक्यपद आहे. उस्मानाबादच्या हारद्या वसावेला राणाप्रताप, तर सोलापूरच्या मैथिली पवारला हिरकणी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हारद्या व मैथिली हे या स्पर्धेतील अष्टपैलू खेळाडू ठरले. सलग दुसऱ्या वर्षी हारद्या वसावेला राणाप्रताप पुरस्कार मिळाला.

पालघर येथे रविवारी (दि. ३) सकाळच्या सत्रात अंतिम सामने खेळवण्यात आले. किशोर गटातील अंतिम सामन्यात धाराशिवने ठाण्याचा ९-८ (मध्यंतर ८-४) अशी सहा मिनिटे राखून एक गुणाने दणदणीत पराभव करीत सलग चौथे अजिंक्यपद मिळवले आहे. मध्यंतराला धाराशिवने चार गुणांची घेतलेल्या आघाडीमुळे त्यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. दुसऱ्या आक्रमणात ठाण्याला चार गडी बाद करता आले. त्यामुळे हा सामना धाराशिवने सहज जिंकला. विजयी धाराशिवतर्फे भीमसेन वसावे (१.४०, २.३० मि. संरक्षण व ३ गुण), भिमसिंग वसावे (१.५०, १.१० मि. संरक्षण व ३ गुण), विरसिंग पाडवी (१.३०, १.३० मि. संरक्षण) यांनी चौफेर खेळ करीत मोठा विजय मिळवून दिला, तर पराभूत ठाण्याच्या ओंकार सावंत (२.२० मि. संरक्षण व १ गुण), विनायक भांगे (३ गुण) यांनी चांगला खेळ केला.

किशोरी गटाचा अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. शेवटच्या मिनिटांपर्यंत रंगलेल्या या सामन्यात सोलापूर संघाने दोन गुणांनी धाराशिवला पराभूत केले. शेवटपर्यंत थरारक ठरलेल्या या सामन्यात सोलापूरच्या स्नेहा लामकाणे (३, २.४० मि. संरक्षण व २ गुण), अनुष्का पवार (१.३० मि. संरक्षण व ४ गुण), कल्याणी लाखमणे (१.१०, १ मि. संरक्षण व २ गुण), समृद्धी सुरवसे (२.३० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी विजयात महत्त्वाची कामगिरी बजावली, तर पराभूत धाराशिवच्या सिद्धी भोसले (२ मिनिटे संरक्षण), मैथिली पवार (१.३० मि. संरक्षण व ६ गुण), मुग्धा वीर (२ मि. संरक्षण व १ गुण), आस्ना शेख (१.२०, २.१० मि. संरक्षण), राही पाटील (१.१० मि. संरक्षण) यांनी जोरदार लढत दिली, मात्र विजयाचे दान धाराशिवच्या झोळीतच पडले.

# जलतरणपटू मयंक म्हात्रेने पार केले धरमतर ते करंजा अंतर

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील करंजा कोंढरीपाडा येथील मयंक दिनेश म्हात्रे (वय १०) याने धरमतर जेट्टी ते करंजा जेट्टी हे १८ किलोमीटर अंतर पाच तास १३ मिनिटांत पोहून पार केले.

यापूर्वी मयंकने अनेक जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेऊन नेत्रदीपक यश मिळविले होते. त्याने रविवारी (दि.३) पहाटे ४ वाजून १४ मिनिटांनी पेण तालुक्यातील धरमतर खाडीत उडी घेतली व पोहत पोहत तो सकाळी ९ वाजून २७ मिनिटांनी उरण तालुक्यातील करंजा जेट्टीवर पोहचला.

मयंक हा उरण शहरातील सेंट मेरी स्कूलमध्ये इयत्ता पाचवीत शिकत आहे. त्याचे वडील दिनेश म्हात्रे, आई वीणा दिनेश म्हात्रे, मार्गदर्शक शिक्षक किशोर पाटील (केगाव दांडा), प्रशिक्षक हितेश भोईर (करंजा) यांचे मयंकला नेहमी मार्गदर्शन लाभते. वयाच्या पाचव्या वर्षापासूनच मयंक पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेत आहे. त्याच्या यशाचे कौतुक होत आहे.




जेएनपीटीचे माजी विश्वस्त भूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते संजय ठाकूर, संतोष ठाकूर, मच्छींद्र म्हात्रे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी, क्रीडा क्षेत्रातील शिक्षकांनी मयंक म्हात्रे याची भेट घेऊन त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# सातारा, मुंबई उपनगर, परभणी, पिंपरी चिंचवड, अहमदनगर, जळगाव संघांची आगेकूच

## मुख्यमंत्री चषक कुमार-कुमारी अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

**ठाणे : प्रतिनिधी**

येथील स्व. आनंद दिघे क्रीडानगरीत महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली विठ्ठल क्रीडा मंडळ व प्रशांत जाधवर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुवर्ण महोत्सवी मुख्यमंत्री चषक कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी कुमार विभागात सातारा, मुंबई उपनगर पश्चिम, परभणी; तर कुमारी विभागात पिंपरी चिंचवड, अहमदनगर, जळगाव यांनी विजय मिळवित आगेकूच केली.

कुमार विभागात फ गटात सातारा संघाने नांदेड संघावर ४७-३० अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला सातारा संघाकडे २२-१९ अशी आघाडी होती. साताऱ्याच्या चैतन्य पाटील व आशिष करण यांनी जबरदस्त खेळ करीत विजय सोपा केला, तर अर्थव सावंत व प्रणव धुमाळ यांनी चांगल्या पकडी घेत नांदेडचे आक्रमण परतवून लावले. नांदेडच्या याकुब पठाण व विशाल बेडगे यांनी चांगला प्रतिकार केला, तर संदेश राठोड व आर्यन धावले यांनी पकडी केल्या.

इ गटात मुंबई उपनगर पश्चिम संघाने बीड संघावर ५०-३८ अशी मात करीत विजय मिळविला. मुंबई उपनगर पश्चिम संघाकडे मध्यंतराला २३-२० अशी निसटती आघाडी होती. रजत राजकुमार सिंगने चौफेर हल्ला चढवित आपल्या संघाला विजय मिळवून दिला. त्याला ओम कुडले यांनी पकडी घेत चांगली साथ दिली. बीडच्या राहुल टेके याने चांगला प्रतिकार केला. संदेश देखमुख याने पकडी केल्या.

ड गटात अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात परभणी संघाने हिंगोली संघावर ३९-३८ अशी अवघ्या एक गुण फरकाने विजय मिळविला. मध्यंतराला परभणी १५-२६ असा पिछाडीवर होता, मात्र मध्यंतरानंतर परभणी संघाच्या अंकुश भांडे व बाबुराव जाधव यांनी जोरदार आक्रमण करून हिंगोलीच्या संघाचा बचाव भेदला व आपल्या संघाला विजय मिळवून दिला. त्यांना अतुल जाधव व विजय तरे यांनी पकडी घेत चांगली साथ दिली. हिंगोलीच्या संघाचा मध्यंतरानंतर बचाव व आक्रमण ढेपाळले. त्यामुळे त्यांना आपली आघाडी राखण्यात यश आले नाही. परिणामी त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. हिंगोलीच्या दिगु दहातोंडे व लखन राठोड यांनी जोरदार चढाया केल्या, तर चैतन्य पावले, सचिन चव्हाण यांनी चांगल्या पकडी केल्या.





कुमारी विभागात सायंकाळच्या सत्रात ग गटात झालेल्या सामन्यात पुणे जिल्ह्याच्या पिंपरी चिंचवड संघाने नाशिक शहर संघावर ४४-२४ असा विजय मिळविला. मध्यंतराला पिंपरी चिंचवड संघाकडे २८-११ अशी आघाडी होती. पिंपरी चिंचवडच्या मनिषा राठोड हिने चौफेर चढाया करीत प्रतिस्पर्धी संघाचा बचाव खिळखिळा केला. सिद्धी गायकवाड हिने सुरेख पकडी घेत संघाला विजय मिळवून देण्यात हातभार लावला. नाशिक शहर संघाच्या प्रियंता सुर्वे हिने जोरदार आक्रमण करीत पिंपरी चिंचवडच्या संघाचा बचाव भेदण्याचा प्रयत्न केला, मात्र तिला यश आले नाही. पूजा शिंदे हिने चांगल्या पकडी केल्या.

फ गटात दुसऱ्या सामन्यात अहमदनगर संघाने बीड संघावर ७५-१२ असा दणदणीत एकतर्फी विजय मिळविला. मध्यंतराला अहमदनगर संघाकडे ४२-४ अशी निर्णायक आघाडी होती. अहमदनगरच्या वैष्णवी काळे व पूजा पाडवी यांनी चौफेर चढाया करीत मैदान दणाणून सोडले व बीडच्या संघाला हतबल केले. स्नेहा पवारा हिने सुरेख पकडी घेत विजय सोपा केला. बीडच्या मनिषा आडे व किरण कुटे यांनी चांगला खेळ केला.

इ गटात तिसऱ्या सामन्यात जळगाव संघाने नांदेड संघावर ५५-४२ अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला जळगाव संघाकडे ३३-२६ अशी आघाडी होती. जळगावच्या पूजा लोहार व ऋती महाजन यांनी जोरदार चढाया केल्या. ऋतीने अष्टपैलू खेळ केला. नांदेडच्या सानिया अलिशेर हिने चांगल्या चढाया केल्या, तर सानिया चौगुले हिने चांगल्या पकडी केल्या.

# सर एली कदुरी स्कूलची विजयी सलामी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व राष्ट्रीय मिल मजदूर संघतर्फे कामगार महर्षी स्व. गं.द. आंबेकर स्मृती चषक विनाशुल्क आंतर शालेय सुपर लीग कॅरम स्पर्धेमधील दक्षिण मुंबई विभाग प्राथमिक फेरीत सर एली कदुरी स्कूल-माझगाव, अँटोनियो डिसोझा हायस्कूल-भायखळा संघांनी सलामीचे सामने जिंकले. सर एली कदुरी स्कूलला विजयासाठी



उमरखाडीच्या सेंट जोसेफ हायस्कूलने २-१ असे झुंजविले.

मुख्याध्यापक धर्मेंद्र वाघ, पर्यवेक्षक मंगेश पांचाळ, क्रीडा शिक्षक सुनील

**आंबेकर स्मृती शालेय कॅरम स्पर्धा**

जाधव, प्रॉमिस सैतवडेकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा झाला. प्राथमिक फेरीतील विभागवार उत्कृष्ट संघांमध्ये सुपर लीग कॅरमचे सामने ९ ते ११ डिसेंबर रोजी परेल येथील आरएमएमएस सभागृहात होतील.

# स्पोर्ट्स लीडर ऑफ द इयर पुरस्काराने शुबमन सन्मानित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर फलंदाज शुबमन गिलने 'स्पोर्ट्स लीडर ऑफ द इयर'चा किताब पटकावला. इंडियन बिझनेस लीडर अवॉर्ड सोहळ्यात त्याला हा सन्मान प्रदान करण्यात आला.

शुबमनला हा पुरस्कार केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी प्रदान केला. शुबमन तिन्ही फॉरमॅटमध्ये २०२३ या वर्षात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे.

# विनायक भणगेची राष्ट्रीय खो-खो संघात निवड



**नवी मुंबई : बातमीदार**

पालघर येथे ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबरदरम्यान किशोर-किशोरी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा झाल्या. या स्पर्धेतून १३ ते १७ डिसेंबर या कालावधी कर्नाटकमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला गेला. या संघात कोपरखैरणे येथील ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनचा खेळाडू विनायक भणगे याची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# शारीरिक तंदुरूस्तीसाठी डॉक्टरांचा पुढाकार

## अलिबाग येथील क्रीडा स्पर्धांमध्ये कुटुंबियांचाही सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूडमधील डॉक्टरांनी ते व त्यांच्या कुटुंबियांसाठी क्रीडा स्पर्धा अलिबागजवळील आरसीएफ वसाहतीमधील क्रीडा संकुलात आयोजित केली होती. वैद्यकीय उपचाराबरोबरच शरीर फिट ठेवण्यासाठी वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकार महत्त्वाचा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

अलिबाग व मुरूड मेडिकल असोसिएशनच्या वतीने क्रीडा स्पर्धा भरविण्यात आली होती. त्यामध्ये क्रिकेट, बॅटमिंटन, कॅरम, टेबल टेनिस, धावणे आदी खेळांचा समावेश होता. या स्पर्धेत डॉक्टरांसह त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले.



या क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ प्रमुख पाहुणे उपजिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, योगाफेम विद्या मोहिते व रायगड प्रीमियम लीगचे अध्यक्ष राजेश पाटील व डॉ. महेंद्र दोषी यांच्या उपस्थितीत झाले.

या वेळी अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. उज्वल जैन, माजी अध्यक्ष डॉ. गणेश गवळी, डॉ. मयूर कल्याणी, डॉ. आशिष भगत, डॉ. अनघा भगत, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. राजेंद्र मोकल, स्पोर्ट सेक्रेटरी डॉ. राजाराम हुवान, डॉ. संजय पाटील, असोसिएशनचे पदाधिकारी डॉ. अमित बेनकर, डॉ. सोनाली नाईक, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. समीर धाटावकर, डॉ. भूषण शेळके, डॉ. अनिकेत पाटील, डॉ. आदेश मोकल, डॉ. सुलतान हसवारे उपस्थित होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com